भाग ३

ता रिणी दुर्गसंसारसागरस्य

१. मधुराचे पत्र		६७
२. गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु	– ओंकार कोर्टीकर	६९
३. अर्थभावाचा फुलोरा	– अविनाश काळे	७१
४. हे तो प्रचितीचे बोलणे	– संध्या उमेश कुलकर्णी	७७
५. जीवनमूल्यांची प्रश्न मंजुषा	– शुभांगी पाटील रावेर	८१
६. एका मित्राचे मनोगत	– भालचंद्र पाठक	८९
७. साधना पथावर चालताना चुकते कोठे	– प्रा. किसान माने	९३
८. नंदा सौख्य भरे	– प्रा. किसान माने	९६
९. स्वामीजींचा आत्मसंवाद	– अलका मुतालिक	९८

१. मधुराचे पत्र

।।श्री ।।

प.पू. स्वामीजींना

साष्टांग नमस्कार.

थोडा अंतर्मुख स्वभाव आणि थोडा धीटपणाचा अभाव यामुळे आजपर्यंत तुमच्याबद्दलचा आदर बोलून दाखवू शकले नाही. पण जसजशी तुमची ओळख वाढली, पुस्तके वाचली तसतसे आपण किती अधिकारी व्यक्तीला भेटलो आहोत याची जाणीव झाली. तुमच्या स्वभावामुळे आणि अनुभवामुळे आपल्याविषयी आस्था, आदर आपसूकच निर्माण झाले आहे. सद्यपरिस्थितीत गृहस्थाश्रमातील व्यक्तीला मार्गदर्शन करणे ही तुमची मोठी हातोटी आहे.

कोणत्याही आध्यात्मीक गोष्टींचे अवडंबर न करता, न घाबरवता इतके साधे, सरळ आणि सोपे करून जे तुम्ही लिहीले आहे हे तुमचे उपकारच आहेत. असे तर हजारो प्रश्न सामान्य माणसाच्या मनात कुतुहल स्वरूप असतात, की त्याला हे प्रश्न कुठे विचारावेत हे माहित नसते आणि उत्तर तर सापडत नाही. ही तगमग नकळत दैनंदिन जीवनावर परिणाम करते तुम्ही अशा कित्येक गोष्टीची अत्यंत वेधक आणि वेचक पध्दतीने उकल करून सांगितली आहे. ध्यान, मौन, वाणी, निद्रा इत्यादी.

तुम्ही कल्पना करू शकणार नाही की या बाबी मला किती मार्गदर्शक ठरले आहेत. कारण विचार-तरंगहीन मौन याचा अनुभव मला आला आहे. तोपर्यंत मनाची शांतता अशक्यप्राय गोष्ट वाटत होती. वाणीचा विषय तर आजपर्यंत डोक्यावरून गेला होता, पण आपण अधिकारी वाणीने आणि इतक्या योग्य पद्धतीने ओघवत्या भाषेत लिहीले आहे की लहान मूलसुध्दा समजू शकेल. उपासनेबद्दल नवीन, योग्य दिशा आणि दृष्टी तुम्ही सर्वांना दिली आहे. निद्रा हा विषय नवीनच पद्धतीने समजला. त्यावेळी तुमच्या ज्ञानाच्या प्रगाढतेची प्रकर्षाने जाणीव होते.

जेव्हा मी तुमची पुस्तके वारंवार वाचली तेव्हा ती मला दरवेळी नव्याने कळत गेली. भारतभ्रमणाचा अनुभव, अध्यात्मीक अधिकार, ज्ञान त्याचबरोबर सर्वसामान्याबद्दल अतीव करूणा जागोजागी आढळते. तुमचा निरहंकारी स्वभाव, प्रांजळपणा प्रकर्षाने जाणवतो. एखादी अध्यात्मीक अधिकारी व्यक्ती इतकी निस्पृह कशी असू शकते त्यापेक्षा कशी असावी हे तुमच्याकडे पाहिल्यावर पटते. भाषेवर प्रभुत्व, चपखल उदाहरणे, योग्य विषय यामुळे सर्व पुस्तके वाचकांसाठी पर्वणी आहेत. वाचकाचा आपोआप साधक होईल.

शेवटपर्यंत उनाडक्या करणाऱ्या मुलाला आयती उत्तरे guide, notes देवून परीक्षा चांगल्या मार्कांने पास करविणे हे जसे challenging तसेच आयुष्यभर भरकटलेल्या जीवांना सगळ्या अध्यात्माचे, उपासनेचे पचेल असे अमृतसार देऊन तुम्ही उद्धरण्याचे काम करीत आहात. ते नक्कीच प्रशंसनीय आणि वंदनीय आहे.

तुम्ही एकहाती इतके अभ्यासपूर्वक लिहले आहे की बाकी कोणतेही ग्रंथ चाळायची गरज नाही. आयते दर्जेदार मार्गदर्शन आमच्या पर्यंत पोहोचवल्याबद्दल मी शतश: ऋणी आहे. हजारो लोकांच्या मनातील

शंकाचे निराकरण झाले एवढे उपकार करून ही तुमच्या वागण्यात कुठेही अभिमानसुद्धा नाही, उलट बोलण्यात करूणा, प्रेम, आपलेपणा क्षणोक्षणी जाणवतो.

आमच्या सर्वांच्या आयुष्यात तुमचे येणे ही आई जगदंबेची आमच्यावर असीम कृपा आहे.

तुमचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद असेच आम्हां सर्वांना आयुष्यभर मिळत राहोत ही विनंती.

आपली कृपाभिलाषी,

सौ. मधुरा.

नागपूर

दि. २६/०६/२०१३

स. ६ वाजता

पूजनीय स्वामी सवितानंद,

काल आपण उपनिषदातील गहन विषय, वेदातांतील अतिशय कठीण सत्य आपण खूपच सोप्या भाषेत, सहज समजेल अशा रितीने मांडले. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत असत सत्य आतच आहे, आत डोकावून पहा. आपणही सत्य कस पहायच हे सर्वसामान्यांना कळेल अशा रितीने सांगितले. काल खूप खूप आनंद झाला. वाटलं आपल्या मुखांतून प्रत्यक्ष श्रीरामकृष्णच बोलत आहेत.

आपला नम्र

अनिल नांदेडकर

एका मित्राचे मनोगत: भलचंद्र पाठक

स्पायरल पान ६८-७२

३. ''गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु:''

लेखक : प.पू. स्वामी सवितानंद - प्रकाशक : प्रसाद प्रकाशन, पुणे.

- ओंकार कोर्टीकर

ॐ श्री सद्‌गुरवे नमः

माझ्या आयुष्यात काही व्यक्तींचे आणि काही ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण आहे. यामध्ये अगदी उच्चासनावर विराजमान आहेत प. पू. सद्‌गुरु स्वामी श्री सवितानंद आणि त्यांची ग्रंथसंपदा त्यातही त्यांचे गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु हे पुस्तक (नव्हे जिज्ञासू साधकासाठी जणू अंबरपीयूष अर्थात ऑक्सीजन) कोहिनूर हिरा आहे असे म्हणायला हवे!

मला आठवते २००८ साली मी प्रथमच हे पुस्तक वाचले. एक वर्ष आधीच आमच्या प. पू. पिताश्रींचे प्राणोत्क्रमण झाले होते. २००५ सालापासून वडील आजारी पडल्यापासून अनेक अनुभव येत होते.अर्थ कळत नव्हता. खूप अस्वस्थता येत होती. कोणाला विचारु ? कोण अधिकारी व्यक्ती आहे जी या गूढ आध्यात्मिक अनुभवांचा उलगडा करु शकेल? काहीच कळत नव्हते. आणि माझ्या बंधुकडे, डॉ. लक्ष्मीकांत कोर्टीकर यांच्याकडे कोणीतरी हे पुस्तक आणून दिले. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु !

परमेश्वरीकृपाच म्हणावयास हवी, काही कारणाने मी नगरला गेला असता हे पुस्तक दृष्टीस पडले. हातात घेतले अनुक्रमणिका वाचतानाच रोमांच उभे राहिले. पुढील दोनच दिवसात संपूर्ण पुस्तक वाचले आणि मंडळी काय सांगू? त्यानंतरचे तीन दिवस मी असीम शांततेचा अनुभव घेत होतो. ३ वर्षांची अस्वस्थता,घालमेल सगळी संपली होती. कारण सगळी रहस्ये जणू उलगडली होती. माझ्या सगळ्या 'असे का?' ची उत्तरे स्वामीजींनी पुस्तकात दिली होती. गुरुसेवा किती कठीण असते पण तीच तुम्हाला कशी तारुन नेते हे प. पू. स्वामीजी स्वतःच्या उदाहरणाने स्पष्ट करतात. अनेक शब्द आपण व्यवहारात सहजपणे वापरतो, जसे दर्शन,सत्पुरुषांच्या-देवाच्या दर्शनाला जातो म्हणजे काय ? हे प्रथमच समजले.

पुराणामधील अनेक गोष्टी उदा. गजेंद्रमोक्ष कथा, ब्रह्मर्षी विश्वामित्र यांची कथा, महर्षी जमदग्नी तसेच राजा हरीश्चंद्राची कथा आणि त्यातील अध्यात्मिक रहस्ये, मानवी जीवनाशी असणारा त्याचा संबंध, या कथांमधून आपण काय बोध घ्यायचा हे स्वामीजी ज्या सहजपणे सांगतात ते पाहिले की, माझ्या बाबतीत तरी दोन गोष्टी होतात १) मला स्वामीजींच्या विलक्षण बुध्दीचे प्रचंड आश्चर्य वाटते आणि मी मनोमन साष्टांग नमस्कार घालतो. आणि २) माझ्या बौद्धीक जाड्याबद्दल लज्जाही वाटते. अहो या अशा गोष्टींमध्ये असा काही गूढ अध्यात्मिक संदेश असेल का ? असा प्रश्नही पडत नाही हो ! काय करावं ?

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' या श्लोकाचे स्पष्टीकरण तर अफाटच आहे. सगळ्यात सुंदर भाग आहे तो म्हणजे प्रश्नोत्तरे. सर्वसामान्य साधकाला पडणारे असंख्य प्रश्न उदा. गुरुची आवश्यकता काय ? अधिकारी गुरुला कसे ओळखावे ? शिष्य कसा असावा इत्यादि अनेक प्रश्नांची उत्तरे स्वामीजी अनेक उदाहरणांनी ज्याप्रकारे

स्पष्ट करतात, ते वाचून खरोखर धन्य वाटते.

’गहना कर्मणो गति’ हे प्रकरण तर पुन्हा पुन्हा वाचावे आणि स्वतःला दुरुस्त करावे असे आहे. कर्मफल कर्मावर नाही तर पाच गोष्टींवर आधारीत आहे. त्या पाच गोष्टी आणि त्यांचे विवेचन वाचताना स्वामीजींचा अधिकार लक्षात येतो! ध्यान, ध्यानाचे महत्त्व, पंचकोष आणि साधना आणि यातील गुरुकृपेचे, त्यांच्या चैतन्य शक्तीचे महत्त्व ही रहस्ये तर गूढतम आहेत. आज व्यवहारात इतक्या सहज सुंदरपणे अशी रहस्ये कोणीच उलगडून सांगत नाही.

शिवलिंग विज्ञान, षटचक्र रहस्य, राम नामाचे रहस्य अशा अनेकविध गूढ विषयांना स्पर्श करणारे स्वामीजी या ग्रंथाद्वारे साधकाला अध्यात्माच्या गूढ गुहेतील अनेक रहस्ये प्रकाशमान करुन दाखवतातच, परंतु असे अनेक विषय जे आपल्याला माहिती आहेत, आपण ते कधीना कधी अनुभवलेले आहेत उदा. मंदिरात गेल्यावर घंटा वाजवणे, श्रीगुरुचरित्रातील रजकाची कथा, यामधील रहस्य काय? काय समजावुन घ्यायचं यातून ? याही गोष्टी स्वामीजी स्पष्ट करतात.

अध्यात्मातील प्रगतीसाठी वृत्तीपालट हा महत्त्वाचा विषय आहे. अनेक जन्मातील पुण्यकर्म साठले की मग सद्‌गुरु सत्तेशी गाठ पडते, नाहीतर फक्त भेट होते किंवा ती ही होत नाही माझा ठाम विश्वास आहे की, ज्यांच्या गाठीशी हे पुण्य जमा झाले आहे किंवा होईल, त्यांच्याच हातात ’गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु’ हा ग्रंथ पडेल आणि स्वामीजींची कृपादृष्टीच या ग्रंथामधून त्या साधकावर पडेल ! कारण त्याची वेळ आली आहे ! तुमची वेळ आली आहे का ?

या ग्रंथातील स्वामीजींनी उलगडून सांगितलेली जमदग्नी ऋषींची कथा जिज्ञासू साधकांच्या डोळ्यांतून अश्रू काढल्याशिवाय रहात नाही. आपल्या वर्तमान सांसारिक, अध्यात्मीक स्थितीबद्दल अनेकांच्या मनात खूप प्रश्न असतात. मी चांगला वागतो / चांगली वागते,पण माझ्या नशिबी असे भोग का? याचे स्पष्ट उत्तर या प्रकरणातून मिळते. आजवर लहानपणापासून अनेकदा ऐकलेल्या, वाचलेल्या कथेनुसार आपण महर्षी जमदग्नी यांना कोपिष्ट,तामसी असेच समजत आलो. किरकोळ कारणांमुळे संताप येऊन महारागीट ऋषी म्हणजे जमदग्नी ऋषी असे आपण समजतो. पण खरेच तसे आहे का ? असे असते तर त्यांना महर्षी का म्हटले असते? सप्तर्षी मध्ये स्थान कसे मिळाले असते? हा विचारच आपल्या मनात येत नाही. एखादे वासनाबीज मनुष्याचा कर्माच्या रहाट गाडग्यात कसे घालते व त्या वासनेची पूर्ती होण्यासाठी काही वेळा शेकडो वर्षे तर काही वेळा हजारो वर्षे लागतात हे स्वामीजींनी श्रीगुरुचरीत्रातील रजकाच्या कथेने आणि संत मिराबाईच्या कथेने स्पष्ट केले आहे आणि त्याच पद्धतीने रेणुका मातेच्या मनातील वासनाबीज नष्ट होण्यासाठी त्यांनी मृत्यूदंडाची आज्ञा, आपले पुत्र श्री भार्गवराम अर्थात परशुराम यांना का दिली ? हे वाचले,की आपण महर्षी जमदग्नींसमोर नतमस्तकच होतो. आणि त्याचबरोबर हे रहस्य आपल्यासारख्या सर्वसामान्यांना उलगडून सांगणाऱ्या स्वामीजींच्या समोरही पुनः पुनः नतमस्तक होतो. कारण असे काही रहस्य असू शकते याची कणभरही कल्पना कोणालाच नसते. यासाठी हवी विचक्षण बुध्दीमत्ता, भगवतीची कृपा (कारण अशी रहस्ये तीच उलगडून सांगते !) आणि सद्‌गुरुंचे आशीर्वाद ! आणि हो ! यासोबत हवा लोककल्याणाचा ध्यास ! स्वार्थाच्या अंशाचा ही लवलेश नसणाऱ्या स्वामीजींना शतकोटी प्रणाम!

सद्गुरुचरणरज

वैद्य ओंकार कार्टीकर, संगमनेर

४. अर्थभावाचा फुलोरा

– अविनाश काळे

प.पू. स्वामीजींच्या आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या पुस्तकांचा पसारा मांडून बसलो आहे. तशी तर सगळीच पुस्तके एक, दोन, तीन वेळा वाचून झाली आहेत. पण प्रत्येक वेळी एखादी नवीनच गोष्ट त्यातून गवसते, जणू काही सागरात पुन्हा पुन्हा डुबकी मारावी आणि प्रत्येक वेळी नवीन रत्न हाती लागावे. आज सगळी पुस्तके हारीने मांडल्यावर एक विशेष गोष्ट (जी मागेही एकदा लक्षात आली होती, पण कालांतराने विस्मरणात गेली होती) म्हणजे स्वामीजींच्या पुस्तकांची मुखपृष्ठे. पू. स्वामीजींजवळ त्यांच्या चाहत्यांनी तसेच साधक शिष्यांनी अनेकवेळा ही गोष्ट अधोरेखित केली आहे. स्वामीजींनी यावर 'काही सुचते का बघ' अशी आज्ञा केल्याने ही लेखन कामाठी.

स्वामीजींची आतापर्यंत एकंदर सतरा पुस्तके मराठी भाषेत प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' पासून ते 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' पर्यंत अशी एकूण बारा पुस्तके पुण्याच्या प्रसाद प्रकाशन संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यानंतरची पाच पुस्तके व 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' या पुस्तकाचे हिंदी, इंग्रजी व गुजराती भाषेतील रुपांतर स्वामीजींच्याच प्रेरणेने उदयास आलेल्या व स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या प्रकाशपर्व प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केली आहेत. प्रस्तुतचे लिखाण स्वामीजींच्या मराठी मुखपृष्ठांच्या वैशिष्ट्यापुरतेच मर्यादित ठेवण्याचा मानस आहे.

'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' हे पहिले पुस्तक सोडले तर नंतरच्या प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. पुस्तकाच्या वाचनाची सुरुवातच मुखपृष्ठापासून व्हावी असा स्वामीजींचा आग्रह असतो. पुस्तकातील वर्ण्य विषयाला साजेसे मुखपृष्ठ तयार झाल्याशिवाय पुस्तक प्रकाशित होऊ नये असा स्वामीजींचा कटाक्ष असतो. पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहूनच आतल्या विषयाची वाचकाला लख्ख कल्पना यावी असा त्यामागचा उद्देश असतो.

आता हेच बघा ना, 'साधनापथावर चालताना चुकते कोठे ? ' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पथिकांचा एक जथ्था मार्गाच्या सुरुवातीला दाखवला आहे. अनेक वेडी वाकडी वळणे असलेली साधनेची ही वाट जेव्हा अंतिम लक्ष्यापर्यंत पोहचते तेव्हां तिथे एक, दोन पथिकच दिसतात. मला हे पाहून श्रीमद् भगवत गीतेच्या सातव्या अध्यायातील तिसरा श्लोक, 'मनुष्यानां सहस्त्रेषु ....' आठवतो. ज्याचा शेवट भगवान श्रीकृष्णाने 'यतताम् आणि सिध्दानाम् कश्चिन्माम् वेति तत्त्वतः ।' असा केला आहे.

स्वामीजींचे तिसरे पुस्तक 'सर्वसुखासी पात्र होईजे– सोळा संस्कार, धर्म आणि विज्ञान' हे आहे. मुखपृष्ठावर एका ओबडधोबड दगडातून सुरेख मूर्ती घडवताना, एका कुशल शिल्पकाराचे छिन्नी हातोडा घेतलेले हात दाखवले आहेत. मानवी जीवन घडवणे म्हणजे आपल्या संस्काराच्या छिन्नी, हातोड्याने सर्वांग सुंदर मूर्ती घडवणे हे स्वामीजी अगदी आपल्याही नकळत,सहज सांगून जातात.

स्वामीजींच्या चौथ्या, 'हे तो प्रचितीचे बोलणे' या पुस्तकावर गुलाबाच्या फुलावर बसलेल्या मधमाशीचे

चित्र आहे. प्रसाद प्रकाशनाचे अध्वर्यू कै. मनोहर जोशी यांची ही कल्पना होती असे प्रस्तावनेत सांगताना स्वामीजी म्हणतात, बापूसाहेबांना वाचकांना असे सुचवायचे असेल, फुलातून मध घ्यायचा असेल तर मधमाशी व्हा, साधी माशी नाही. या पुस्तकाचा संदेश ईशतत्त्वाचा अनुभव तुम्हालाही येऊ शकतो, अट एवढीच की मधमाशी व्हा. मधमाशी जशी फुलातून हळूवारपणे कणाकणाने मध गोळा करते,तसेच ईशकृपा पण कणाकणानेच होते, आपले अवधान मात्र पाहिजे !

स्वामीजींचे या नंतरचे पुस्तक 'प्रेमाचे डोही अध्यात्माचे तरंग' याचेही मुखपृष्ठ फारच वैशिष्ट्यपूर्ण आहे. तळ्याच्या काठी डोंगर दाखविलेला असून डोंगराच्या कासराभर वर सूर्यबिंब तळपते आहे. सूर्याचा प्रकाश तळ्याच्या पाण्यात खोलवर झिरपत आहे. ईशप्रेमात बुडाल्याशिवाय अध्यात्माचे तरंग साधकाच्या मनःसरोवरात उठणार नाहीत. असेच जणू स्वामीजी सांगत आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठांच्या पुस्तकांच्या यादीतले पुढचे पुस्तक आहे, 'इतुक्या जीवांचा करितो सांभाळ' मुखपृष्ठावर हत्तीच्या गळ्यातून साखळी तुटून खाली पडत असलेली घंटा चितारलेली असून त्या घंटेच्या खाली एक पक्षीण व तिची अंडी दाखविलेली आहेत. हत्तीच्या चित्राच्या पार्श्वभूमीवर अस्पष्टशा युध्दोन्मुख आकृती दिसत आहेत. प्रथमदर्शनी तरी हे मुखपृष्ठ कोड्यात टाकणारे वाटते. पण पू. स्वामीजींनी या कोड्याची उकल मलपृष्ठावरील मजकुरात स्वतंत्र केली आहे. मग मूळ शीर्षकाकडे परत लक्ष जाते आणि एकनाथ महाराजांच्या हरिपाठातील ओवी डोळ्यासमोर नाचू लागते. 'इतुक्या (सकळ) जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसे नाही ।।' मलपृष्ठावरील स्पष्टीकरण वाचून ईशसत्ता प्रत्येक प्राणीमात्राची काळजी आपल्या कल्पने पलीकडे कशी घेते याचा उलगडा होतो. अशाच काही घटना या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळणार याची खूण पटते. एक गोष्ट आवर्जून नमूद करतो, पुस्तकाच्या अंतरंगात न शिरता, मुखपृष्ठ पाहूनच मनात उठलेले विचार नोंदवायचे हा संकेत मोडून स्वामीजींच्या 'मज पामरा हे काय थोरपण' या प्रस्तावनेतील एक उल्लेख उद्धृत केल्याशिवाय रहावत नाही. प्रसादचे अर्ध्वयू कै. मनोहर जोशी यांचे निरीक्षण स्वामीजींनी उपरोक्त प्रस्तावनेत नोंदवले आहे, ते तंतोतंत खरे आहे, असो. यातले सगळेच लेख/ घटना सत्य असूनही तर्काच्या कसोटी पलीकडच्या आहेत. त्यामुळे हे समग्र पुस्तकच बसल्या बैठकीत वाचून काढावेसे वाटते.

सर्वसामान्य वाचक आणि साधकांना 'हे तो प्रचितीचे बोलणे' या भूमिकेतून मार्गदर्शन करणाऱ्या पू. स्वामीजींचा एक अनोखा पैलू म्हणजे त्यांच्या कवितांचे प्रसाद प्रकाशनाने प्रसिध्द केलेले पुस्तक 'प्रियआत्मन्'. आकाशाकडे आपली चोच उघडी करुन बरसणाऱ्या धारांचे पाणी पिऊ पाहणाऱ्या चातक पक्षाचे चित्र असलेले या पुस्तकाचे मुखपृष्ठ आहे. ज्या झाडाच्या खोडावर तो पक्षी बसलेला आहे. त्याखालची जमीन भेगाळलेली आहे, म्हणजे त्या चातक पक्षासारखीच ती जमीनही तृषार्त आहे, हे स्वामीजींना सांगायचे आहे. कदाचित स्वामीजींना हे ही सुचवायचे असेल की जमीन तृषार्त असेल आणि तिच्यावर पर्जन्यधारा बरसतील तरच तिचं सृजनशीलत्व दृष्टोत्पत्तीस येईल. ईशकृपेसाठी आसुसलेला साधक आणि आभाळातून पडणाऱ्या पाण्यासाठी तहानलेला चातक यांची मनःस्थिती सारखीच असते हे स्वामीजी यातून सुचवताहेत असे वाटते. या पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार करतानाही तृषार्त चातकाचे भाव व त्याचा सभोवताल चित्रात उमटेपर्यंत चित्रकाराकडे पाठपुरावा करावा लागल्याचे अनौपचारिक गप्पांमध्ये पू.स्वामीजींनी सांगितल्याचे स्मरते.

शीर्षक आणि विशेष अशा मुखपृष्ठांमुळे नजरेत भरणारे स्वामीजींचे आणखी एक पुस्तक म्हणजे, 'श्रीदुर्गासप्तशती रहस्य अर्थात रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग '. तुकाराम महाराजांच्या गाथेतील एका

अभंगाच्या सुरुवातीची ही पंक्ती आहे. मूळ अभंग असा

रात्रंदिवस आम्हा युध्दा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।।

या अभंगाची ही जी दुसरी ओळ आहे ती पुढे आल्यावर पुस्तकात कोणत्या विषयाचे प्रतिपादन केले आहे याची पुसटशी कल्पना येते. साधकाला सदा-सर्वदा ज्या आघाड्यांवर लढावे लागते अशा दोन आघाड्यांची कल्पना शीर्षकाचा अध्याहृत असलेला पुढचा भाग वाचून येते त्या म्हणजे आत असलेले आपले मन आणि बाहेर असलेले जग. अभंगाचा शेवट तुकाराम महाराजांनी पुढील दोन ओळींनी केला आहे.

तुका म्हणे तुझ्या नामाचिये बळे । अवधियांचे काळे केले तोंड ।।

अर्थात, (देवा) तुझ्या नामसाधनेच्या साहाय्याने आम्ही हा आतल्या आणि बाहेरच्या शत्रूंचा हल्ला परतवून लावू.

आता मुखपृष्ठावरील चित्राकडे वळूया. मुखपृष्ठावर महिष आणि सिंह यांचे युध्दाच्या पवित्र्यातले चित्र चितारलेले आहे. या मुखपृष्ठाचे वैशिष्ट्य म्हणजे, वनामध्ये दोन पशू जेव्हा झुंजीसाठी आमने सामने येतात तेव्हा त्यांचा स्वाभाविक पवित्रा म्हणजे त्यांच्या शारीरिक क्षमता आणि त्यांची आयुधे यांचा अविष्कार असतो. त्यामुळे समोरच्या शत्रूला मारण्याच्या पावित्र्यात रेडा मान खाली झुकवतो आणि शिंगे उगारतो, त्याचवेळी आपल्या खुराने जमीन उकरुन धूळ उडवत असतो व शेपटी वर केलेली असते एवढ्या सर्व बारकाव्यासह स्वामीजींनी ते चित्र तयार करवले आहे. सिंहाचे आयुध म्हणजे तीक्ष्ण नखे असलेले त्याचे मजबूत पंजे. समोरच्या शत्रूला घायाळ करण्यासाठी उडी घेऊन पंजा उगारण्याचा पवित्रा सिंह घेतो. मुखपृष्ठावरील चित्र पाहून आपण रेडा (महिष) आणि सिंह यांची खरीखुरी झुंज पहात आहोत असे भाव आणि अविर्भाव त्या दोन युध्दोन्मुख प्राण्यांच्या मुद्रेतून दिसत आहेत याची प्रचिती येते. हे मुखपृष्ठ तयार करताना, चित्रकाराला हे सगळे बारकावे समजावून सांगावे लागल्याचे स्वामीजींकडून आश्रमातील एका सत्संगाचे वेळी समजले.

महिष रुपातील महिषासूर आणि माँ दुर्गेचे वाहन असलेला सिंह यांचे दुर्गासप्तशती रहस्यामध्ये केलेले वर्णन यांचा आमच्याशी (साधक/वाचक) संबंध काय असे कुतुहल पुस्तक हातात घेतल्यावर वाटते. ग्रंथाच्या अंतरंगात शिरल्यावर विषय साधक/ वाचकांशी संबंधित आहे असे निदर्शनास येते. साधना करतांना दिवस रात्र अंतर्बाह्य शत्रूशी कसे झुंजावे लागते हे उमजून येते.

स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या 'प्रकाशपर्व प्रकाशन' या संस्थेतर्फे प्रसिध्द झालेले पहिले पुस्तक, 'प्रश्न आमचा उत्तर तुमचे भाग ३.' पुस्तकाच्या मुखपृष्ठावर मातीच्या डेऱ्यामध्ये दह्याची घुसळण दाखविली असून डेऱ्यावर 'आत्ममंथन' असे लिहिले आहे. पुस्तकांच्या या मालिकेत (यापुर्वी भाग क्र १ व २ प्रसाद प्रकाशनाने प्रकाशित केले आहेत). स्वामीजी साधक/ वाचकांना प्रश्न विचारुन उत्तराची अपेक्षा करतात. स्वामीजींना साधना म्हणजे आत्ममंथन असे तर सुचवायचे नाही ना? असा मला प्रश्न पडतो. यावरुन मला एका मराठी भक्तीगीताची आठवण होते ते गीत असे 'देह देवाचे मंदिर,आत आत्मा परमेश्वर....' जसे दह्यामध्ये लोणी तसा देही चक्रपाणि. 'आत्ममंथन' करुन देहात दडलेल्या नवनीत रुपी चक्रपाण्याला प्राप्त करुन घ्या असे स्वामीजी सुचवताहेत, असे वाटते.

पुस्तकाच्या खालच्या डाव्या कोपऱ्यात 'प्रकाशपर्व प्रकाशनाचे' बोधचिन्ह (Logo) आहे. ते बोधचिन्हही लक्ष वेधून घेते. उघड्या पुस्तकातून (ज्ञानाचा) सूर्य उगवतांना दिसतो आहे आणि (अज्ञान) तिमिराचे हरण होईल हे आश्वासन दिलेले आहे. मोठं अर्थपूर्ण बोधचिन्ह आहे ! हे स्वामीजींच्या या पुढच्या प्रत्येक पुस्तकावर हे बोधचिन्ह पहायला मिळणार आहे.

'प्रश्न आमचा उत्तर तुमचे (भाग ४)' या पुस्तकाचेही मुखपृष्ठ वैशिष्ट्यपूर्णतेने लक्षवेधक बनले आहे. गडद अंधाराच्या पार्श्वभूमीवर एका पेटलेल्या पणतीच्या दोन्ही बाजूला एक एक पणती आहे, जी अजून पेटायची आहे. या पणत्यांपासून थोडी दूर एक छोटी पेटलेली पणती आहे. या मोठ्या तीन पणत्यां खाली 'असीम अंधेरेको कोसो मत एक दिया और जलाओ' असा मास्टर स्ट्रोक असलेला संदेश आहे. स्वामीजी यातून काय संदेश देत असावेत ? अंधाराला दोष देऊन चालणार नाही, दिवा तर लावावाच लागेल. पण इतर कोणाची वाट न बघता,'दिया तो खुद आपको ही जलाना पडेगा' असा संदेश स्वामीजी देतात. पुस्तकाच्या अंतरंगात शिरल्यावर प्रत्येक पानातून हेच सतत जाणवत राहते. मला हे मुखपृष्ठ म्हणून खुप भावते.

प्रकाशपर्व प्रकाशनाचे तिसरे पुस्तक आहे, 'ओंजळीतील चंद्र श्रीमद् भगवद्गीता : रचना सौंदर्य व आशय सौंदर्य.' मुखपृष्ठावर पौर्णिमेचा चंद्र आकाशात पूर्ण तेजाने प्रकाशमान. त्या चंद्राचे इवलेसे प्रतिबिंब दोन्ही हातात धरलेल्या चांदीच्या वाटीतील दुधात पडलेले आहे. या पुस्तकाचे शीर्षकच इतके बोलके आहे की, भगवद्गीते वरील टीकेच्या असंख्य पुस्तकांपैकी हे पुस्तक नाही हे लगेच जाणवते. महर्षी व्यासांच्या त्रिकालज्ञ प्रतिभेचे श्रीमद् भगवद्गीता हे जर लेणे मानले तर त्या लेण्यातील रचना आणि आशयसौंदर्याचा मागोवा (तत्त्वज्ञानाला बाजूला ठेवून), स्वामीजींना घ्यावासा वाटला ही बाबच मुळी चौकटी बाहेरचा विचार अधोरेखित करते. त्यामुळे पुस्तक हातात घेणाऱ्या वाचकाची उत्सुकता आपोआच ताणली जाते. तसंच आपल्यापासून कोसो दूर असणाऱ्या श्रीमद् भगवद्गीतारुपी चंद्राचे सौदर्य स्वामीजी अगदी आपल्या हातातल्या चांदीच्या वाटीत प्रतिबिंब रुपाने आणून सोडत आहेत असे वाटते.

स्वामीजींचे नुकतेच म्हणजे दोन एप्रिल २०२१ रोजी नाथषष्ठीचा योग साधून प्रकाशित झालेले पुस्तक 'महामाया प्रभावेण– श्री दुर्गासप्तशती रहस्यः प्रथम चरित्र' या मुखपृष्ठावर केशरी रंगाच्या पार्श्वभूमीवर गतीमान रथाचे चित्र काढलेले आहे. रथाला अर्जुनाच्या रथासारखे पाच शुभ्र अश्व असून त्या प्रत्येक अश्वाला शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध अशी नावे दिली आहेत. रथी आणि सारथी यांच्या जागा रिकाम्या आहेत आणि त्यावर एकेक ठळक प्रश्नचिन्ह दाखवले आहे. हे मुखपृष्ठ ही विचारांची शृंखला उभी करते. थोडा खोलवर विचार केला की, लगेच उमगते यामध्येही साधक/ वाचकांच्या विचार चक्राला गती देण्याचा स्वामीजींचा मानस आहे. थोडा स्मृतीला ताण दिल्यावर असे लक्षात येते की, स्वामीजींना कठोपनिषदाच्या तृतीय वल्लीच्या पहिल्या अध्यायातील रुपकाची आठवण करुन द्यायची आहे तो श्लोक असाः

आत्मानं रथिनं विध्दि शरीरं रथमेव तु ।
बुध्दिं तु सारथिं विध्दि मनः प्रगहमेव च ......मनीषिणः ।।

या सुंदर रुपकाचे चित्रमय अवतरण म्हणजे प्रस्तुतचे मुखपृष्ठ. साधकाचे शरीर हा रथ आहे. या जड शरीराला वाहून नेणारे घोडे म्हणजे पंच ज्ञानेंद्रिय. या घोड्यांना लगामाच्या सहाय्याने नियंत्रित करुन इच्छित स्थळी न्यायचे असेल तर कुशल सारथ्याची जरुरी आहे. तो सारथी म्हणजे आपली बुध्दी. ही बुध्दी मनरुपी लगामांच्या सहाय्याने रथीच्या इच्छेने रथ हाकणे, रथी महत्त्वाचा. तो रथी म्हणजे जीव म्हणजे साधक स्वतः स्वामीजींनी रथाच्या पाचही घोड्यांना शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध अशी नावे दिली आहेत. या म्हणजे एकेका ज्ञानेंद्रियाशी निगडीत पाच तन्मात्रा. या तन्मात्रांना मनाच्या लगामांद्वारे नियंत्रणात नाही ठेवले तर काय अनर्थ घडतो हे पुढील दृष्टांत वजा सुभाषितातून प्रतीत होते.

कुरंग मातंग पतंग मीना । भृंगाः हताः पंचभिरेव पंच।
एकः प्रमादी स कथं हन्यते । य सेवते पंचभिरेव पंच ।।

तात्पर्य शब्द, स्पर्श, रुप, रस,गंध यांनी वरील एकेका प्राण्याचा घात होतो. मग जो (जीव) या पाचांचेही सेवन (अवलंबन) करतो त्याची काय गत होईल? यास्तव पंच तन्मात्रांच्या या घोड्यांना मनाच्या लगामांद्वारे बुध्दीरुपी सारथ्याकडून काबुत ठेवून, रथीला युद्ध करायचे आहे आणि विजयही मिळवायचा आहे. मग हा रथी साधक स्वतःच असला पाहिजे. वेगाने धावणारा हा रथ माणसाच्या (साधकाच्या) सतत गतीमान असणाऱ्या जीवनाचे प्रतिनिधित्व करतो. या वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठाचे अवलोकन केल्यावर या पूर्वीच्या मध्यम चरीत्रावरील (रात्रंदिन आम्हायुध्दाचा प्रसंग) पुस्तकाप्रमाणे याही पुस्तकात स्वामीजींनी दुर्गासप्तशती रहस्यातील काही भागाची सांगड साधनेशी घातली असली पाहिजे हे सहज उमजते.

या नंतरचे स्वामीजींचे या वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर प्रसिध्द झालेले पुस्तक, 'मी तू पणाची झाली बोळवण श्री दुर्गासप्तशती रहस्य : उत्तर चरित्र' थोड्याशा गडद पार्श्वभूमीवर दोन पणत्या इतक्या जवळ दाखवल्या आहेत की, त्यांच्या ज्योती एकरुपच झालेल्या दिसतात. एक पणती छोटी असून दुसरी मोठी आहे. एकनाथ महाराज रचित श्रीदत्तगुरुंच्या आरतीतील शेवटच्या कडव्याची तिसरी ओळ या पुस्तकाच्या शीर्षकरुपाने येथे अवतरते. पण ती हे ही सांगून जाते, दत्त दत्त असे ध्यान लागले म्हणजे मन हरपते, उन्मन होऊन जाते, असे उन्मनी मन मग भक्त आणि भगवंत, साधक आणि परब्रह्म यातील दुरावा नाहीसा करते, **मी तू पणाची बोळवण करते**.

आता दोन पणत्यांच्या चित्राकडे वळू या. एक लहान पणती म्हणजे साधक आणि मोठी पणती म्हणजे परब्रह्म असा संकेत स्वामीजींना अभिप्रेत असावा. साधकाच्या जीवनातील साधनेचे अंतिम साध्य म्हणजे परब्रह्मरुपाशी ऐक्य, भक्त आणि भगवंत यांची एकरुपता. स्वामीजींनी आश्रमातर्फे आम्हा सर्व साधकांना नित्य उपासनेची एक पुस्तिका भेट दिली आहे. त्यातील 'रक्षास्तुती' या प्रार्थनेमध्ये शेवटून दुसरे कडवे आहे.

त्रिशूल धारिणी व्याघ्र वाहन वेगि संकट टारिये।
इस ज्योतिको निज ज्योतिमे मिलाय प्रणको पालिये।।

मला वाटते याच प्रार्थनेची अभिव्यक्ती म्हणजे या एक ज्योती झालेल्या या दोन पणत्या.

स्वामीजींच्या 'सूर्यकन्या साधना कुटीर' या आश्रमातर्फे खाजगी वितरणातली प्रकाशित झालेल्या दोन पुस्तिकांच्या मुखपृष्ठाचीही याच स्फुट लेखामध्ये दखल घेण्याचा मानस आहे. त्यापैकी एक म्हणजे '**मुक्ती सोपान**' आकाशी निळ्या रंगाशी साधर्म्य असलेली ही पुस्तिका आश्रमाच्या दीक्षित साधकांच्या नित्यपाठासाठी तयार करण्यात आली आहे. जमिनीपासून आकाशाच्या दिशेने जाणाऱ्या पायऱ्या असलेला जिना (सोपान) दाखविलेला आहे. साधक जस जसा साधनेच्या पायऱ्यावर चढत जाईल तस तसे वातावरणाची प्रतिकूलता जसे की प्राण वायू कमी होणे अशा वेळी साधकाला आधाराची गरज असते. तसेच साधनेत इतर अडथळे ही येतात, जसे की सिद्धी प्राप्ती होऊन किर्ती मोहात भान विसरुन साधकाचा पाय घसरण्याची शक्यता असते. त्यासाठी दोन्ही बाजूला माँ शरणम् । व गुरु शरणम्। हे कठडे आधारासाठी दिले आहेत. पृष्ठाच्या उजव्या कोपऱ्यात 'यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।', असे भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायातील ६ व्या श्लोकाचे दुसरे चरण उद्धृत केले आहे. 'मुक्तीसोपान' या शीर्षकाला 'स्वयंस्पष्ट' करणारे हे गीतेचे अवतरण आहे. यावर अधिक भाष्याची खरोखर आवश्यकता नाही असे वाटते.

स्वामीजींच्या आश्रमात जिज्ञासू साधकांसाठी वितरित केलेली दुसरी पुस्तिका म्हणजे '**अथा तो शक्ति जिज्ञासा।**'. स्वामीजींचे गुरुमहाराज म्हणजे आम्हा साधकांचे परात्पर गुरु प. पू. ब्रह्मलीन सद्गुरु श्री शक्तिबालक परमहंस यांच्या 'प्रबोधिनी भाष्य' या अध्यात्मिक ग्रंथातील निवडक भागाचा हा संग्रह आहे.

'ब्रह्मसूत्र' या ग्रंथाची सुरुवात 'अथा तो ब्रह्मजिज्ञासा या सूत्रवचनाने होतो. तद्वत या पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर 'अथा तो शक्ति जिज्ञासा' हे शीर्षक विराजमान आहे. मुखपृष्ठावर दोन पावले दाखविली आहेत. गडद काळ्या रंगाचे पैंजण घातलेले व कुंकवाचा टिळा लावलेली स्त्रीचे म्हणजे शक्तीचे पाऊल. शुभ्र त्रिपुंड्र रेखाटलेले तोडा असलेले निळसर रंगाचे पुरुषाचे म्हणजे शिवाचे पाऊल. शिवशक्तीच्या अद्वैताचा संकेत देणारे हे मृखपृष्ठ, शक्तीला जाणण्याची इच्छा ठेवली तर शिव स्वाभाविकपणे समजून येईल असा तर संकेत देत आहे तथापि पुस्तकातील वर्ण्य विषयावर काही अभिप्राय स्वरुपात संकेत द्यावेत इतकी माझी पात्रता नाही. पुस्तकाचे मूल्य मात्र अत्यंत समर्पक आणि बोलके आहे. ते निदर्शनास आणून दिल्याशिवाय रहावत नाही. **मूल्य: वाचन, चिंतन, मनन.**

अंमळ लांबलेल्या या लेखाचा समारोप करतांना सांगावेसे वाटते की, मी साहित्यातला जाणकार नाही. पण श्रेष्ठ साहित्यकृतींचे जे अनेक मापदंड आहेत त्यापैकी एक मापदंड 'सूचकता' होय. इथे तर स्वामीजींच्या बहुतेक सगळ्याच पुस्तकांची सुरुवात सूचक आणि समर्पक मुखपृष्ठ आणि शीर्षकांपासून झालेली आहे. परिणामी वाचकांची उत्कंठा ताणली जाऊन पुस्तकांच्या अंतरंगात शिरण्यास तो उद्युक्त होतो. मुखपृष्ठांविषयी हा स्फुटलेख लिहितांना एक मर्यादा आखून घेतली होती. शक्यतो सर्व लिखाण मुखपृष्ठ या विषयापुरते सीमित ठेवायचे. पुस्तकातील प्रतिपाद्य विषयाला विस्तारभयास्तव व माझी तेवढी पात्रता नसल्याने स्पर्श करायचा नाही. बहुतांश ठिकाणी हे बंधन पाळण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही कुठे मर्यादातिक्रम झाला असेल त्या अपराधाबद्दल क्षमस्व. इति ।

।।जय अंबे ।।

अविनाश स. काळे
मुलुंड (पूर्व)

४. हे तो प्रचितीचे बोलणे

–सौ. संध्या उमेश कुलकर्णी, कोल्हापूर

मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते ।
कृपा केलिया रघुनाथे । प्रचिती येते ।।

समर्थ रामदासांच्या दासबोधातील या उक्तीप्रमाणे भगवंताचे लक्ष आपल्या भक्ताकडे कसे असते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे प. पू. स्वामीजी. माँ भगवती तिच्या बाळाची प्रत्येक पावलाला कशी काळजी घेते याचा दृष्टांत म्हणजे '**हे तो प्रचितीचे बोलणे**' हा स्वामीजींनी लिहिलेला ग्रंथ होय.

या ग्रंथाचे मुखपृष्ठ हेच खर तर याची प्रस्तावना म्हणता येईल. हे चित्र सारे काही सांगून जाते. गुलाबाच्या सुंदर फुलावर बसलेली मधमाशी, जाणीव करुन देते की, फुलामध्ये मध आहे पण तो घेण्यासाठी मधमाशीच व्हायला हवे, ते सातत्य हवे. ईश्वरीतत्त्वाचा अनुभव येण्यासाठी हेच परिश्रम हवेत. स्वामीजींनी लिहिलेल्या या ग्रंथांच्या प्रस्तावनेत सरुताई, चारुशीला पटवर्धन,सौ. कैलास यांचे जे अनुभव आहेत ते आपल्याला या वाटेवर चालण्यासाठी उद्युक्त करतात. कधीतरी स्वामीजींच्या कृपेने, तेजाने आपल्यालाही जाणवलेला गहरा तरंग आणि चंदनाचा सुवास आठवतो. आजही आठवणीने अंग शहारते. आपले स्वामीजी हे दिव्यत्वाची प्रचितीच आहेत. अनंत जन्मांची ईश्वरी कृपा घेऊन जन्मलेल्या या विभूतीमत्त्वाची त्यांच्या लहानपणापासूनच भविष्याची आखणी आपल्याला दिसते ती त्यांना येणाऱ्या प्रचितीतून.

वय १२–१३ वर्षाचेच असताना आणि खरे तर संन्यासी कोणाला म्हणतात हे ही माहित नसताना अचानक स्वामीजींच्या तोंडून वाक्य बाहेर पडले, मी मागच्या जन्मीचा संन्यासी आहे आणि या जन्मात पण संन्यास घेणार आहे, केव्हा ते मात्र माहित नाही.' (पृ. १४) पहिल्याच प्रकरणात आलेले हे वाक्य वाचून अंगावर काटा येतो. कधी कशाचाच हट्ट नाही, जे असेल त्यात आनंद जणू काही जन्मजातच संन्यासी, हो हेच खरे. जन्मजातच संन्यासी म्हणून तर ते नववीत असतानाच अचानक एक दिवस डोळ्यासमोर दिव्य प्रकाश पसरतो आणि स्वामी विवेकानंद पुढे उभे राहतात. त्यांचा आवाज स्वामीजींच्या कानावर येतो. देव, देश आणि धर्माच्या सेवेसाठी तुला संन्यास घ्यावयाचा आहे आपण आज याची प्रचिती घेतच आहोत. स्वामीजींच्या प्रत्येक शब्दातून, पुस्तकातून, प्रवचनातून, कृतीतून त्यांची देशभक्ती समोर येते. त्यांचे हे अनन्य साधारण देशप्रेम मला खूप भावते. मी कोणालाही त्यांच्या विषयी सांगताना हे आवर्जून सांगते की ते जाज्वल्य राष्ट्रभक्त आहेत.

दिनांक ३ डिसेंबर १९७६ (दत्तजयंती) ला स्वामीजींनी गृहस्थाश्रमाचा त्याग केला. बाहेर पडताना वडिलांनी ज्ञानेश्वरीचे कुठले तरी पान उघडून दहा ओव्या वाचायला सांगितल्या. प्रचिती आलीच स्वामीजींनी पान उघडले आणि सुरुवात केली.

जेथिचि ये अनित्यतेची थोरी । या ओवीपासून, तरी झडझडोनि वहिला निघ । इथे भक्तीचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग । निजधाम माझे । या ओवी पर्यंत. (पृ.२२) सारे संभ्रम संपले. आपल्या बाळाला

परमेश्वराने असे हक्काने,मायेने आणि संपूर्ण काळजी घेण्याची हमी देऊन मार्गस्थ केलेले अनुभवल्यावर त्या माता पित्यांना कोण धन्यता वाटली असेल!

स्वामीजींचा पायी प्रवास सुरु झाला. माँ भगवतीच्या मायेची उब त्यांच्या सतत सोबत होतीच. गिरनारला पोहचल्यावर गुरुजींच्या आणि पू. अमृतगिरी बापूंच्या रुपाने दत्त महाराजांनी त्यांची पूर्ण काळजी घेतली. गुरु शोधाच्या त्यांच्या उद्देशाची तयारी इथे पूर्ण झाली. ईश्वर प्राप्तीत अडथळा म्हणून मायेने केलेला एक खेळ म्हणजे सिध्दी. गिरनारला स्वामीजींना अनेक सिद्धी प्राप्त झाल्या, पण अतिशय सहजपणे त्यांनी त्यांचा त्याग केला. ही गोष्ट या क्षेत्रात खूप कठिण आहे. म्हणूनच स्वामीजी श्रेष्ठ आहेत, वेगळे आहेत. मायेवर विजय मिळवून आकाराला आलेले एक तेजोवलय म्हणजे स्वामीजी.

आपण वैराग्य हा शब्द किती सहजपणे आणि कितीतरी वेळेला वापरतो. पण याची खोली किती याची आपल्याला जाणीवच नसते. वैराग्याची व्याख्या करताना स्वामीजी म्हणतात, 'सहज प्राप्य प्राप्त वस्तू बद्दल आकर्षण नसणे एवढ्याला वैराग्य म्हणत नाहीत तर अप्राप्य व अप्राप्त वस्तूबद्दल आकर्षण न वाटणे वैराग्य आहे. त्यांच्या बद्दल चिंतनरहित अवस्था वैराग्य आहे.' या वैराग्याच्या मार्गावर प्रत्येक क्षणी जागृत राहण्याचा संदेश स्वामीजींनी दिला आहे.

परमेश्वर सर्वत्र आहे आणि म्हणून तो मूर्तीत आहे हे त्यांनी खूप सुंदरपणे सांगितले आहे. मूर्ती एक संस्कार आहे आणि मूर्तीपूजा म्हणजे त्या संस्काराची पूजा. परमेश्वर निराकार आहे, म्हणूनच तो कोणताही आकार धरू शकतो. तो निर्गुण आहे म्हणूनच कोणतेही गुण धारण करु शकतो. परमेश्वराची ही लीला सांगताना त्यांनी निर्गुण आणि सगुण या शब्दांची व्यापकता समजावून सांगितली आहे. साकार उपासना आणि सगुण साकार उपासना हे दोन्ही शब्द पूर्वी सारखेच वाटायचे. स्वामीजींच्या विवेचनातून हे कळले की, मूर्तीपुजा मन, बुध्दीचा विषय नाही. तर तो हृदयाचा, भावनांचा, प्रगाढ आपलेपणाचा, अत्यंतीक आत्मीयतेचा विषय आहे. स्वामीजींचे सारे लिखाण आपल्या मनातील संभ्रम दूर करते. स्वामीजी सांगतात की, भौतिक कामनांसाठी इष्टदेवतेची प्रार्थना करु नका. प्रारब्धात आहे ते भोगायची तयारी ठेवा. इष्टदेवतेकडे प्रार्थना केल्यावरही तुमची मनोकामना पूर्ण झाली नाही तर अस्वस्थ, बेचैन, अश्रध्द न होता तुमच्या मांगल्यासाठीच, तुमच्या कल्याणासाठीच तुमची इच्छापूर्ती केली नाही असे समजून साधनेत मग्न रहा. स्वामीजींनी दाखवलेल्या या धारणेमुळे आपल्याला आधार मिळतो. संकटाकडे बघण्याचा नवीन दृष्टीकोन मिळतो.

उपासना हा शब्द तर आपण उठता बसता नेहमीच वापरतो. पण स्वामीजींनी त्याचा सांगितलेला अर्थ वाचला की घाम फुटतो. या शब्दाचा परीघ किती मोठा आहे याची जाणिव होते. स्वामीजींनी खूप छान उदाहरणे देऊन उपासनेची संकल्पना समजावली आहे. उपासना म्हणजे दोर कापला आहे, परतीचा रस्ता नाही. आता लढून विजय मिळवा किंवा मरा हे सूर्याजीचे वाक्य अध्यात्मीक अर्थाने जीवनात उतरवणे. मग जाणवते की, आपली उपासना किती वरवरची आहे, भौतिकाशी जोडलेली आहे. खूप तीव्रतेने जाणवले की फक्त पूजा पाठ, ग्रंथ वाचन ही उपासना नाही तर उपासना हा एक अनुभवाचा विषय आहे. उपासनेवर स्वामीजींनी केलेले विवेचन एक शिस्तबद्ध मार्ग आखून देते अगदी रेल्वेच्या रुळासारखे. आता यावरुन चालत राहण्याची योग्यता अंगी यावी हीच माँ भगवतीला प्रार्थना.

परमेश्वराच्या सगुण रुपाशी स्वतःला जोडतानाचे, त्यांच्याशी संवाद साधतानाचे स्वामीजींनी जे अनुभव दिले आहेत ते वाचताना अश्रुपात थांबत नाही. स्वामीजींचा प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य आणि विचार, अगदी सगळं काही म्हणजे – 'मैं तो कहत आखन देखी' या कबीरांच्या उक्तीप्रमाणे प्रचितीचे बोल आहेत.

राजस्थानच्या श्रीनाथजींनी स्वामीजींची इच्छा पूर्ण करण्यासाठी मंदिराच्या पुजाऱ्यांना स्वप्नात जाऊन सांगितले की, आमची राजभोगाची थाळी स्वामीजींना द्या. पुजारी स्वामीजींना शोधत आले आणि स्वप्नात दिसलेली ही व्यक्ती म्हणजेच स्वामीजींना बघून त्यांना अश्रू अनावर झाले. मंदिरात नेऊन 'श्रीं' च्या राजभोगाची थाळी त्यांनी स्वामीजींना दिली. या साऱ्या प्रचिती पुन्हा पुन्हा स्वतःला भानावर आणून वाचाव्या लागतात. पुराणातल्या ऋषीमुनींच्या दिव्य कथा वाचताना असे वाटतेच ना की खरंच असे घडले असेल काय? पण इथे स्वामीजी या सर्वातून सहज पार होऊन आपली प्रचिती सांगत आहेत. राहून राहून स्वतःच्या नशिबाचा हेवा वाटतो की, आपल्याला स्वामीजींचे दर्शन वारंवार मिळाते, त्यांचे पाय आपल्या घराला लागतात, सुख सुख म्हणतात ते हेच. मला वाटते आपल्यासाठी हीच प्रचिती खूप मोठी आहे.

स्वामीजींची त्यांच्या गुरु महाराजांप्रतीची श्रध्दा बघून विचार थांबतात व शब्द संपतात. यापेक्षा उत्कट काही असूच शकत नाही. ***गुरु को पारस जानिए, करे लौह को स्वर्ण। शिष्य और गुरु जगत में, केवल दो ही वर्ण।*** या उक्तीची प्रचिती म्हणजे स्वामीजीची गुरुभक्ती. गुरुमाऊली शिवाय त्यांचे दुसरे विश्वच नाही. गुरुमहाराजांच्या जन्मानिमित्त गुरु महाराजांच्या आजोबांनी गावात माँ पार्वतीचे स्वतंत्र मंदिर बांधले होते. त्याचे नामकरण केले गेले माँ बालेश्वरी. गुरुमहाराजांनी माँ बालेश्वरीलाच गुरु मानून आपली साधना सुरु केली. माँ बालेश्वरीने शरीरधारी गुरुंप्रमाणेच बाबांना मंत्रदीक्षा व साधना शिकवली. गुरुमहाराजांना योगाची सर्व रहस्ये ज्ञात करुन 'माँ 'ने त्यांना पूर्णत्वाला नेले. गुरुमहाराजांच्या संन्यासानंतर हे स्थान जरा उपेक्षित झाले. बाबांच्या आज्ञेने स्वामीजींनी या मंदिराची दोन वर्षे सेवा केली. सुरुवातीला त्यांना त्रास आणि विरोध झाला पण 'माँ' त्यांच्या बरोबर होतीच ना. या विश्वासामुळेच बाबांनी त्यांना पाठवले होते.

'माँ' बद्दल लिहिताना स्वामीजी खूपच भावविभोर होतात. किती किती सांगू असे होते त्यांना. स्वामीजींनी तिथे जशी पूजा सुरु केली तसे मूर्तीत तेज येऊ लागले. भगवतीच्या अनंत कृपेचे ज्या विविध प्रकारे स्वामीजी वर्णन करतात ते वाचताना वाटते की स्वामीजी 'माँ' ला स्तुतीरुपी वेगवेगळ्या अलंकारांनी सजवतात. त्यातील आत्मीयता पाहून वाटते, आपल्या लाडक्या लेकीला आई खूप कौशल्याने नटवते. माँ पण त्यांच्याकडून सगळं करून घेते, खूष होते. म्हणूनच तर माँ त्यांच्याशी बोलू लागली. हवे नको सांगू लागली. थंडी वाजल्यावर चहा दे म्हणू लागली. स्वामीजी पण भूक लागल्यावर माँ ला सांगू लागले आणि त्यांची व्यवस्था होऊ लागली. गावात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांची सूचना माँ स्वामीजींना आधीच देऊ लागली आणि अगदी तसेच घडू लागले. हे सगळे परीकथेतल्या गोष्टी सारखे वाटते पण हीच तर आहे स्वामीजींची प्रचिती. स्वामीजींची प्रत्येक प्रचिती म्हणजे अलौकिक दैवी कृपेचा धबधबाच, स्वामीजींच्यासाठी माँ सारे काही करते.

स्वामीजींनी एक छान प्रचिती सांगितली आहे माँ ने त्यांना रागावल्याची. माँ बालेश्वरीच्या सेवेत असताना स्वामीजी एकदा ध्यानात बसले होते, माँ ने त्यांना सांगितले, 'नुसते ध्यानातच काय बसुन राहतो ऊठ आणि बगीच्याला पाणी दे. तुला जशी तहान लागते तशी झाडांना पण तहान लागते. तुझ्यात आत्मा आहे तसा त्यांच्यात पण आहे. मी फक्त मंदिरातच नाही या झाडांमध्ये पण आहे. ऊठ आणि पाणी दे.' (पृ.११०) किती गोड वाटते हे वाचताना. ही प्रचिती आपल्यापुढे स्वामीजींनी का ठेवली? कारण आपल्यालाही या गोष्टीची जाणीव व्हावी म्हणून.

गृहस्थाश्रमात असताना पण स्वामीजींना दैवी प्रचिती येतच होती. औदुंबरला श्री गुरुचरित्राचे पारायण पूर्ण झाल्यावर त्यांना तोंडात औदुंबराचे फळ आहे असे वाटले, तीच चव,तोच सुवास. गोंदवल्याला

महाराजांची पालखी उचलून प्रदक्षिणा घालताना भल्याभल्यांना घाम फुटतो पण स्वामीजींनी हनुमंताचे स्मरण करून पालखी सहज उचलली. असे अनेक अनुभव त्यांनी सांगितले आहेत.

सनातन संस्कृतीचे नुसते गोडवे गाणाऱ्या पण आचरणात काही न आणणाऱ्या आजच्या परिस्थितीने ते खूप अस्वस्थ होतात. त्यांना खूप काही करायचे आहे, आणि ते करत पण आहेत. संत हे जगावर उपकार करण्यासाठीच अवतरतात. ईश्वरी सत्तेशी जुळल्यावर प्राप्त झालेल्या ज्ञानाचा प्रसाद जगाला वाटतात. तो पण अगदी मायेने प्रासादिक शैलीमध्ये. स्वामीजींनी आपल्या लिखाणातून, प्रवचनातून अनंत उपकार जगावर केले आहेत.

रोजच्या जीवनातल्या छोट्या छोट्या गोष्टींमधील मोठ मोठी रहस्ये त्यांनी उलगडली आहे. अन्न हे पूर्णब्रह्म आहे हे सांगताना, जेवताना कसे जेवावे ? हे त्यांनी सांगितले. भूक, तहान ही माँ चीच रुपे आहेत. ही शांत करण्यासाठी आहुती योग्यच हवी. स्वयंपाक करणाऱ्याच्या विचारांचे परिणाम, वाढणाऱ्यांच्या विचारांचे परिणाम, भांड्यांची, वापरलेल्या सामग्रीची, जागेची शुध्दता या सर्व गोष्टींचा परिणाम अन्नावर होतो. त्यांच्या वेगवेगळ्या अनुभवांची उदाहरणे देऊन त्यांनी हे विस्ताराने सांगितले आहे.आपण पूर्वी पासून हे ऐकत असतो. पण त्याचा एवढा परिणाम आपल्यावर होत नाही. या गोष्टी स्वामीजींकडून कळल्यावर त्याचे गांभीर्य लक्षात येते. कारण स्वामीजी आपल्यासमोर आहेत आणि ते आपल्यासाठी सद्‌गुरु आहेत.

जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी। कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी ।
प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे । तयाचेनी योगे समाधान बाणे ।। १८३

समर्थांनी सद्‌गुरुंची ही जी बारा लक्षणे मनाच्या श्लोकात सांगितली आहेत ती सर्व स्वामीजींमध्ये आपण अनुभवतो.

स्वामीजींचा हा सारा लेखन प्रपंच आपल्यासाठीच आहे, ते तर सर्व अनुभवून दिव्यत्वाला पोहचले आहेत., अगदी माँ च्या मांडीवर बसले आहेत. पण आपणा सर्वांचे भले व्हावे म्हणून त्यांनी हे सगळे लिखाण केले, प्रवचने दिली. म्हणूनच तर ते संत आहेत. आपण ज्यांचा विचार ही करु शकत नाही, अशा गोष्टी त्यांनी आपल्याला समजावून सांगितल्या. ***फोडून शब्दांचे अंतर वस्तू दाखवील का निजसार । कुणी सद्‌गुरु माहेर अनाथांचे ।***

स्वामीजींची ही ग्रंथ संपदा वाचून, प्रवचने ऐकून एक मात्र नक्की कळते की, आपण किती, किती आणि कित्ती दूर आहोत; मनुष्य जीवनाच्या उद्देशापासून. एकमात्र घडले या सुंदर वास्तवाकडे जायलाच हवे हे कळले, हे ठरले. ही वाट आता सुटू नये हीच स्वामीजींच्या चरणी प्रार्थना.

– संध्या उमेश कुलकर्णी

५. जीवनमूल्यांची प्रश्न मंजुषा

– शुभांगी पाटील रावेर

हाथ गुरु ना थामते, तो कौन जाने किधर जाते। हम तो घडे थे मिट्टी के, टूट कर बिखर जाते।।

प. पू. स्वामीजींनी एका ठिकाणी म्हटले आहे की, 'तुम्ही कोणाच्या चरणांचे वंदन करु शकत नसाल तर ते तुमचे दुर्दैव आहे आणि वंदन करण्या योग्य चरण तुम्हाला दिसत नसतील तर तुम्ही अभागी आहात.'

या प्रसंगी मी ईश्वराचे खूप खूप आभार मानते. कारण माझी पूर्वजन्माची पुण्याई की, या जन्मी मला गुरु रुपात थोर ज्ञानी, अंतर्यामी ऋषीतुल्य स्वामीजी लाभले.

भुखे बालक को मिली जो गोद मां की । इसी तरह शरण, गुरुवर आपका मिल गया ।।

संसाराचा भवसागर पार करण्यासाठी अभौतिक चिदानंद स्वानंदाच्या पारलौकिक क्षेत्रात गुरुंची नितांत आवश्यकता असते. तसेच जीवनात मार्गदर्शक गुरु असणे अपरिहार्य आहे. आदरणीय स्वामीजींनी माझ्या जीवनातील कमतरता पूर्णपणे भरुन काढलेली आहे. क्षणोक्षणी त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद मी अनुभवत असते आणि आता तर पुस्तक रुपाने स्वामीजी घराघरात लाखो लोकांपर्यत जाऊन पोहचलेले आहेत. गोष्ट फक्त एकच आहे की, ज्याचे जसे भाग्य तसे तो त्याचा लाभ घेऊ शकेल. कारण स्वामीजींचा एक एक शब्द मंत्ररुप असतो. स्वामीजी लिखित अनेक पुस्तकांपैकी *'प्रश्न आमचा उत्तर तुमचे'* या पुस्तकाबद्दल मी लिहीत आहे. स्वामीजींच पुस्तक 'प्रश्न आमचा उत्तर तुमचे' हातात पडले तेव्हा दोन तीन गोष्टींनी मन आश्चर्यचकित झाले की, एक तर आपण साधू संतांकडे जातो आपले प्रश्न घेऊन आणि त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा करतो. इथे स्वामीजींनी नेमके उलटे केलेले आहे. या ठिकाणी स्वामीजी प्रश्न विचारत आहे आणि आपल्याला उत्तर शोधण्यास सांगत आहेत. स्वामीजींच्या प्रश्नाचे उत्तर शोधणे म्हणजे पूर्णतः आत्ममंथन करणे आहे. पुस्तकातील प्रत्येक प्रश्न वाचकाच्या मनाला जागवणारा, त्याला अंतर्मुख करणारा आहे. एक न एक प्रश्न इतका टोकदार आहे की तो प्रत्येक संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारा, टोचणारा आणि अंतरंग ढवळून टाकणारा आहे. आपण राहतो त्या समाजाबद्दल, आपल्या देशाबद्दल अशा वेगवेगळ्या दृष्टीने अनेक प्रश्न स्वामीजींनी उपस्थित केलेले आहेत. जीवन ज्ञान देणारा प्रत्येक प्रश्न वाचकाचे मन बेचैन करणारा आहे हे निश्चित !

प्रश्न आमचा उत्तर तुमचे (भाग १,२,३, ४) या चारही पुस्तकांची मुखपृष्ठे अतिशय सुंदर आणि मार्मीक आहेत. पहिल्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाकडे पाहून स्वामीजींची सुंदर अशी कल्पनाशक्ती मनाला एका वेगळ्या भावविश्वात घेऊन जाते जिथे फक्त आनंद आणि प्रेम आहे. मुखपृष्ठावर अतिशय सुंदर अशी कल्पना. फळ्यावर प्रश्न लिहिलेले आहेत. फळा, डस्टर, खडू हे सगळे बघून मला माझे शालेय जीवन आठवले. आमचे शिक्षक असेच प्रश्न लिहायचे आणि आम्हाला त्या प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगायचे. जसे एखादा शिक्षक आपल्या अध्यापन कौशल्याने कठिणातला कठिण विषय सोपा करुन सांगतो व मोठ्या खुबीने विद्यार्थ्यांकडून उत्तरे वदवून घेतो.तसेच स्वामीजींनी वाचकाच्या मनातील असंख्य प्रश्नांची उत्तरे वाचकांकडूनच वदवून घेतली आहेत असे आवार्जून सांगावेसे वाटते.

या पहिल्या पुस्ताकातील पहिलाच लेख, **तो तुम्हाला भेटला असता तर?** हा प्रश्नरुपी लेख

आपल्याला खरोखर अंतर्मुख होण्यास भाग पाडतो की आपण प्रसन्न का रहात नाही ? यात स्वामीजींनी केलेले विवेचन हे खरोखर आपल्या मनाला स्पशुन जाते. प्रस्तुत लेखात गुलामाने दिलेल्या उत्तरांनी बादशहाचे डोळे उघडतात व बादशहा गुलामाला वंदन करुन म्हणतो, बंदगी कशी करावी हे तुझ्याकडून मला कळाले. इथे आपले डोळे उघडण्यासाठी एक मार्मीक वाक्य स्वामीजींनी इथे लिहीले आहे, *'जा विधी राखे राम, ताहि विधी रहिये ।'.*

या पुस्तकातील प्रत्येक लेख आपल्या जीवनास नवसंजीवन देणारा आहे. प्रेमपत्र या लेखातील पहिलेच वाक्य किती सुंदर आहे. *जे स्थान आहे शिवमंदिरात बिल्वपत्राचे । तेच स्थान आहे जीवनमंदिरात प्रेमपत्राचे ।।*

पण आजची तरुण पिढी या सगळ्यापासून वंचित ठरली आहे. शक्ती आणि प्रेम हे दोन शब्द वेगळे नाहीत. अगदी समान अर्थी पर्यायी एकरुप आहेत हे सांगून स्वामीजींनी,आजच्या तरुण पिढीला जिने प्रेमाची संकल्पनाच बदलून टाकली आहे तिला एक नितांत सुंदर असा संदेश दिला आहे. या लेखाचा शेवट रुक्मिणीचे उदाहरण देऊन केलेला आहे. कृष्णाला तोलण्यासाठी रुक्मीणीने टाकलेले तुळशीपत्र हे तिने न लिहिलेले प्रेमपत्र आहे. प्रेमाची खरी परिभाषा स्वामीजी इथे शिकवून जातात.

यानंतरचा स्वामीजींचा पुढचा लेख **दोन पेपर** या मध्ये स्वामीजींनी तरुणास त्यांच्या ओघवत्या शैलीत विचारलेले काही बोचरे प्रश्न. सुरुवातीला विचारलेल्या प्रश्नांनी त्या तरुणांसोबत आपणही अगदी खडबडून जागे होतो आणि लगेच डोक्यात विचार सुरु होतात की, आपण जीवनभर किती तक्रारी करत असतो. ईश्वराकडून किती किती आणि कोणकोणत्या गोष्टींची आपण अपेक्षा करतो आणि दुसरी बाजू बघीतली तर त्याच ईश्वरावर आपला किती दृढभाव आहे, किती श्रध्दा आहे. आपल्याला ईश्वरप्राप्तीची किती आस आहे. याचा कधी विचारही मनात आणत नाही. मानवाच्या जीवनात होणाऱ्या सुख आणि दुःख या विभागणीवर शंका घेणाऱ्या लोकांसमोर स्वामीजींनी इथे दोन पेपर ठेवले आहेत. जो कोणी वाचक हे दोन्ही पेपर सोडवितो तो त्याच क्षणी स्वामीजींना स्मरुन कबुल करतो की, प्रभूचे स्मरण न होणे हीच मोठी विपत्ती, असेच अनेक प्रश्न पुढे आहेत.

यात थोडे पुढे गेले की लक्ष्मणरेषा हा सुंदर लेख आहे. इथे पहिल्यांदाच स्वामीजींनी प्रश्न उपस्थित केला आहे आणि सर्व वाचकांना एक संदेश दिला आहे. तो असा की, लक्ष्मणरेषा फक्त सीतेसाठीच होती का? जी लक्ष्मणरेषा सीतेसाठी होती ती आपल्या जीवनात आपल्या सर्वांसाठी कुठे न कुठे असली पाहिजे. लक्ष्मणरेषा यावरील सर्व लेख प्रत्येक वाचकाला अतिशय अंतर्मुख करतात. आपली जीवनपध्दती आपले आचार-विचार त्याचबरोबर आपण पैसा किती आणि कसा कमवतोय यासारख्या अनेक गोष्टींचा विचार वाचक या ठिकाणी करायला लागतो.

मर्मस्थानी लागलेल्या तीक्ष्ण बाणासारख्या एका वाक्याने एका न्यायाधीशाचे (मनोहर सप्रे) सिध्दपुरुषात रुपांतर झाले म्हणून स्वामीजी तुम्ही न्यायाधीश असता तर? या त्यांच्या लेखातून आपल्याला सांगत आहेत की, गरज आहे चांगले ऐकण्यासाठी कान उघडे ठेवण्याची , *'ॐ भद्रं कर्णेभि शृणुयाम देवाः ।'.*

सत्ता आणि पैसा यांच्या लालसेपोटी आजच्या जगात भीषण परिस्थिती उद्‌भवलेली आहे. नको त्या प्रलोभनाला बळी पडून ज्यांनी कोणी पक्षपात करुन गरीब, असहाय्य आणि निरपराध व्यक्तींवर अन्याय केला असेल किंवा करत असतील त्यांनी प्रस्तुत लेखातील स्वामीजींचे एक वाक्य फक्त एकदा आवर्जून वाचावे. *'सजा देने वालेको पता नही उसको क्या सजा मिलेगी ।'* काय आणि किती लिहावे. पुस्तकातील

प्रत्येक लेख एक नवीन सत्य उलगडवतो आणि वाचकास आत्मपरिक्षण करण्यास प्रवृत्त करतो.

माझ्या गुरुमाऊलींची ही 'अमृतवेल' इथेच खुंटत नाही तर ती **'प्रश्न आमचा उत्तर तुमचे भाग–२ '** च्या रुपाने पुन्हा आपल्याला बहरतांना दिसते आणि या वेलीवर बहरलेल्या प्रत्येक सुंदर, सुगंधीत प्रश्नरुपी फुलाने वाचकाचे जीवन ज्ञानरुपी सुगंधाने अंर्तबाह्य सुवासिक होते.

दुसऱ्या भागाचे मुखपृष्ठ हे अगदी नावाला साजेशे आहे. अगदी न वाचता चित्र बघून कळते की मानवाची आजची स्थिती कशी आहे. मोठे प्रश्नचिन्ह आणि त्याच्या आत खूप गहन प्रश्न पडलेल्या एका माणसाचा चेहरा, जो आपणा सर्वांचा प्रातिनिधिक चेहरा आहे. प्रश्न पडलेला, विचारात गढलेला. स्वामीजींची मार्मीक कल्पनाशक्ती मुखपृष्ठाच्या रुपाने नव्याने आपल्या समोर आहे.

पहिलाच लेख एक वाक्य, एक शब्द, एक अक्षर आपल्या सामान्य माणसाच्या दृष्टीने विचार केला तर यात काय? काही विशेष नाही. एका शब्दाने काय फरक पडतो. बरोबर आहे ना? पण फरक आपल्याला तेव्हा कळतो जेव्हा ज्ञानयोगी स्वामीजी या आपल्या लेखात भागवताचा भा काढून टाकतात आणि शिल्लक फक्त गवत ठेवतात. तेव्हा आपल्याला एका अक्षराची किंमत कळते. कथेतील नावाडी संध्याकाळ झाली घरी परत जायचे म्हणून ओरडत होता, 'हा शेवटचा फेरा! हा शेवटचा फेरा!' तीर्थयात्रा करणाऱ्या यात्रेकरुच्या कानावर हे शब्द पडले. वाक्य हृदयाला भिडले. त्याचा तो भाग्योदयाचा क्षण! पूर्ण जीवन बदलले यासारखी अनेक सुंदर उदाहरणे देऊन फार मोठा प्रश्न घेऊन बसलेल्या माणसाला इथे स्वामीजी सांगतात की, आपले दुर्दैव आपल्या हृदयाची दारे बंद आहेत त्यामुळे कोणत्याही वाक्याने–शब्दाने–अक्षराने आपल्यात कुठलेही अंतर्बाह्य परिवर्तन घडून येत नाही. ऐकलेले सर्व पालथ्या घड्यावर पाण्यासारखे वाहून जाते.

आरशाची एक मोठी गंमत असते । त्यात पाहिल्यावाचून राहवत नाही।

प्रतिबिंब नव्हे प्रखर सत्य ते। अधिक काळ पाहवत नाही।। या ओळी प्रामुख्याने तेव्हा आठवल्या. जेव्हा गुरुमाऊलींचा तुमचा एक हितैषी–आरसा हा लेख वाचला. या लेखात स्वामीजी एक जीवन सत्य सांगतात की, आरशात आपले बाह्यरुप दिसते आणि आरशातील आपल्या डोळ्यात आपलं अंतररुप दिसते जे केवळ आपले आपणच पाहू शकतो आणि मग आपल्या कर्मावर अवलंबून असते की तुम्ही त्या आरशातल्या डोळ्यात डोळा घालून किती वेळ उभे राहू शकता.

कर्म आणि रंग–रुप यात कोणत्या गोष्टीला किती महत्त्व आहे हे पटवून देण्यासाठी स्वामीजींनी प्रस्तुत लेखात एक देखणा तरुण व दुसरा काळा, कुरुप तरुण यांची गोष्ट सांगितली आहे. तसेच भोजराजा आणि कालिदास यांची दरबारातील मातीची काळी कुरुप सुरई व सोन्याची मोहक सुरई यांबद्दलची कथा सांगितली आहे. बाह्य रंग–रुप व कर्म यात कर्माला उच्चस्थान देत स्वामीजी पुढे सांगतात की, प्रत्येक कर्म आरसा झाला पाहिजे. ज्यात तुमचेच नव्हे तर तुमच्या मागे उभ्या असलेल्या प्रभूचे पण प्रतिबिंब पडेल.

चतुर व सुज्ञ वाचक असे संबोधून स्वामीजी आपल्याला पुढे तुम्ही तुमचे शत्रू की मित्र? असा तीक्ष्ण धारदार प्रश्न विचारुन व एका पाठोपाठ चार लेखांद्वारे त्यांनी मनुष्य स्वभावाच्या अनेक विकलांग अवस्थांबद्दल खंत व्यक्त केली आहे. सफलतेची नशा व असफलतेची निराशा या दोन्ही अवस्थांमध्ये आपली सद्सदविवेकबुध्दी जागृत ठेवून वागा असे ते सांगतात व पुढे एक मोलाचा सल्ला देतात तो असा की, 'तू स्वतःच स्वतःचा मित्र आहेस आणि स्वतःच स्वतःचा शत्रू आहेस'

आर्थिक सहकार्य, देणगी, दानधर्म, दानशूर असे काही शब्द ऐकून स्वामीजी आपल्या परोपकाराय पुण्याय या लेखात एक परखड प्रश्न विचारतात की, आपल्यावर आधीच इतके उपकार आहेत की, त्या ऋणातून मुक्त होता येत नाही. तर मग परोपकार कसला? देवऋण, ऋषिऋण, मातृपितृऋण व समाजऋण

आपल्यावर हे एवढे ऋण आहे की ते फेडता फेडता आयुष्य संपते खऱ्या अर्थाने आपण ऋणमुक्तच होत नाही. यावर एक सुंदर वाक्य स्वामीजी बोलून जातात की, हे तथाकथित दान ऋण फेडण्याचा कर्जाचा हप्ताच आहे हे नीट समजून घ्या. हे अनमोल वचन वाचल्यावर दोन ओळी आठवल्या. *अहंकार मत कर किसी को कुछ भी देकर। क्या पता तू दे रहा है या पिछले जन्म का कर्ज चुका रहा है।।*

या नंतरचा स्वामीजींचा पुढचा प्रश्न तुमचे वय काय? प्रश्न वाचल्यावर वाचक मोठ्या अविर्भावात म्हणतो म्हणजे काय? कारण त्याला त्याच वय माहित असते. पण त्याला हे कुठे माहित असते की, तो पुन्हा एकदा स्वामीजींच्या प्रश्नाच्या जाळ्यात अडकलाय. कारण सर्वसामान्य माणसाच्या कल्पनेच्या परे आहे माझ्या गुरुमाऊलीची अगाध आणि अफाट कल्पनाशक्ती.

वयाने शिशु अवस्थेत असताना मुल रडते हे ठरलेले. पण जन्मापासून आपल्याला सवय लागलेली आहे. संघर्ष आला की रडण्याची. संघर्ष आणि जीवनाचे परस्पर नाते आहे हे स्वामीजी इथे आपल्याला सांगतात. संतांच रडणे, मीराबाई-जनाबाई यांच रडणे आणि आपले रडणे यातला फरक शोधण्यास आपण प्रवृत्त होतो व गुरुमाऊली आपल्याला कबूल करण्यास भाग पाडतात की संतांचे रडणे ईश्वरासाठी आणि आमचे मुला-मुलींसाठी! रडता-रडता अचानक माझे मन शांत होते आणि उत्तर मिळते त्या प्रश्नाचे जो आहे तुमचे वय काय?

सुखप्राप्तीची गुरुकिल्ली व जीवनात सफलता महत्त्वाची की सार्थकता, त्याचबरोबर खरा सुखी माणूस कोण? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित करुन स्वामीजी वाचकांना मौल्यवान असे भरपूर सोनेरी सल्ले देतात.

स्वामीजींचे समाजविषयीचे निरिक्षण एखाद्या समाजशास्त्रज्ञासारखे आहे. मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचा त्यांचा सर्वांगिण अभ्यास किती सखोल आहे याची कल्पना त्यांच्या पुढील लेखावरुन येते. आपली दृष्टी आपली सृष्टी हे त्यांचे संपूर्ण १ ते १४ भाग जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारे आहे. लेखाच्या सुरवातीलाच वटवाघूळाचे मजेशीर उदाहरण दिले आहे. वेगवेगळी उदहरणे देऊन सामान्य लोकांची जगाकडे बघण्याची दृष्टी व साधू-संत, ज्ञानी लोकांची दृष्टी यातला फरक आपल्या लक्षात आणून दिला आहे.

कुठलेही सत्कर्म करीत असतांना छळ, लोकनिंदा या गोष्टींना न घाबरता आपण मार्गावर ठाम रहाणे योग्य हे स्वामीजी इथे सांगतात. विचारहीन टोळक्यांचे धनी होणे अयोग्य. याच संदर्भात सौ. प्रतिभा कुलकर्णी यांनी स्वामीजींच्या एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, मोतीबिंदू झालेल्या डोळ्यांचे ऑपरेशन करुन दृष्टी परत आणता येते, पण ज्यांना मुळात दृष्टी आहेच त्यांना खरी जीवनदृष्टी कोण देणार? व्यक्ती तितक्या प्रकृती आणि तितकेच त्यांचे दृष्टीकोण हे पटवून देण्यासाठी गुरुमाऊलींनी आपल्यासमोर गुलाबाकडे बघणाऱ्या पाच लोकांचे उदाहरण ठेवले आहे व आपली दृष्टी आपली सृष्टी ही संकल्पना स्पष्ट केली आहे. स्वामीजींच्या मते अंधे को मंदिर आया देख लोक हँसकर बोले मंदिर मे दर्शन के लिए आए तो हो, पर क्या भगवान को देख पाओगे ? अंधे ने कहा क्या फर्क पडता है मेरा भगवान तो मुझे देख लेगा दृष्टी नही , दृष्टीकोन सही होना चाहिए । दृष्टी मीराबाईची या बोधक अशा लेखात विस्तृत अशा विवेचनानंतर, आपली मीराबाईची दृष्टी प्राप्त करण्यासाठी वाटचालीची तयारी आहे? असा प्रश्न विचारुन पुस्तकाचा समारोप केलेला आहे.

मानवी देहाला सुवर्णालंकारानी सजवण्यापेक्षा अंतर्मनाला वंदनीय स्वामीजींनी सांगितलेल्या सुविचाररुपी अलंकारांनी अलंकृत केल्यास मनाचे साजरे गोजरे हे रुप परमेश्वराला निश्चितच आवडेल यात तिळमात्र शंका नाही. सामान्य माणसाची आजची दशा व दिशा तसेच सुख, दुःख, संकल्प-विकल्पाच्या चक्रव्यूहात अडकलेल्या साधकाची बिकट अवस्था हे बघूनच की काय गुरुमाऊलींनी त्यांच्या प्रश्न आमचा उत्तर तुमचे -भाग ३ या पुस्तकाची निर्मिती केली असावी असे वाटते. स्वामीजींद्वारा लिखीत हा तिसरा

'अमृतकुंभ.'

पुस्तकाच्या मुखपृष्ठाकडे बघूनच कळते की, नक्कीच हजारो साधकांचे अरुण्यरुदन या ज्ञानसूर्याच्या कानापर्यंत पोहचले असावे. साधकाच्या आर्त हाकेला हा अमृतकुंभरुपी प्रतिसाद. दही घुसळून लोणी काढावे असे सुंदर चित्र. स्वामीजींच्या अप्रतिम कल्पनेतून जणू काही मनरुपी कुंभात प्रश्नरुपी दही टाकावे. सद्विचाररुपी रवीने घुसळुन उत्तररुपी लोणी काढावे म्हणजेच सर्वांर्थाने 'आत्ममंथन'

संन्याशी असून ही गृहस्थाश्रमातील सुख-दुःखाच्या फेऱ्यात अडकलेल्या मानवाच्या बाबतीत स्वामीजी किती संवेदनशील आहेत याची जाणीव आपल्याला होते. 'तया गृहस्थाश्रमीच माझी प्राप्ती' या आपल्या लेखात स्वामीजी सांगतात गृहस्थाश्रमात राहून मोक्षप्राप्ती सहज सुलभ आहे, पण त्यासाठी प्रत्येकाने आपले विहित कर्म केले पाहिजे, स्वधर्माचे पालन केले पाहिजे.त्याचबरोबर स्थानभ्रष्टता किती घातक असते हे दात,नख आणि केस यांचे उदाहरण देऊन पटवून दिले आहे. गृहस्थाश्रमात राहून ईश्वरप्राप्ती हवी असेल तर विवेक दृष्टी ठेवून प्रपंच केला पाहिजे. साधकात कोणते दोष नकोत, कोणते गुण हवेत, साधकाने कोणत्या भ्रमातून निघावे, कोणत्या विश्वात रमावे यासारख्या असंख्य गोष्टींचा ऊहापोह 'तुम्ही साधक आहात का?' या दुसऱ्या लेखात केलेला आहे व त्यात एक मार्मीक वाक्य स्वामीजींनी लिहिले आहे ते असे की, 'संसार करा पण भोगासाठी नाही, ईश्वर प्राप्तीसाठी, भोग भोगून अडकण्यासाठी नाही तर निवृत्त होण्यासाठी, संसाराची सर्व कामे अशी करा की, तीच तुमची ईश्वरपूजा ठरेल.'

माणसाची रात्रंदिवस चाललेली धावपळ बघून स्वामीजी सांगतात की तुमच्या पाच कर्मेंद्रियांची, पाच ज्ञानेंद्रियांची धडपड सुख प्राप्तीसाठी आहे. त्यात तुम्ही लोक इतके व्यस्त आहात की, तुम्हाला साधन-भजन करायला पुरेसा वेळ मिळत नाही. साधन-भजन करायचे असेल तर ही पळापळ बंद करा व पुढे आदि शंकराचार्यांचा एक श्लोक सांगतात की, तुम्ही ईश्वरप्राप्तीसाठी आंधळे, बहिरे, पंगू, थोटे व्हायला तयार आहात का? नाही तर मग तुम्ही काहीच प्राप्त करु शकणार नाही.

कलियुगात विषयाच्या गुलाम झालेल्या काही विचारशून्य लोकांसाठी स्वामीजी पुढे लक्ष्मणाचे उदाहरण देतात सीतामातेच्या कानातील कुंडले ते ओळखू शकत नाही. प्रभूरामचंद्रांना लक्ष्मण सांगतात की, 'मी दररोज चरणांचे वंदन करतो त्यामुळे पायातील पैंजण ओळखतो पण कानातील कुंडले नाही. कारण मी मान वर करुन सीता मातेचा चेहरा कधी पाहिलाच नाही.' लक्ष्मणाचा स्त्रीजाती विषयीचा केवढा हा आदरभाव.

अशी एका पाठोपाठ एक मोहक, रंगीबेरंगी पुष्पांची माळ गुंफता गुंफता अगदी मध्यावर सहा-सहा कळ्यांचा गुच्छ लावून या माळेला स्वामीजींनी एक आकर्षक रुप आणले आहे.

कृतघ्नता – कॅन्सर जितका शरीरासाठी घातक तितकीच कृतघ्नता ईश्वराच्या साक्षात्कारासाठी स्वामीजी कृतज्ञ राहायला सांगतात.

कर्जबाजारी– सजीव-निर्जीव, चर-अचर, जड-चेतन सर्वांचे उपकार आठवून त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याच्या प्रयत्नात रहावे.

कठोरता– मुख्य दोन कारणे, संवेदनशून्यता व स्वार्थ-लोभ जो साधनेस बाधक असतो.

कृपणता – जगातला सर्वात मोठा दानी. कारण तो स्वतःसाठी काहीही न वापरता सगळे काही दुसऱ्यांसाठी सोडून जातो.

कायरता – तितिक्षा, धैर्य, सहनशीलता हे गुण कायर व्यक्तीजवळ नसतात.

कटुता – निमित्त, माध्यम बनून आपल्या नशिबातले दुःख आपल्यापर्यंत पोहचविणाऱ्यांबद्दल मनात कटुता येणे

हे चुकीचे.

असा हा 'क' चा कळकळाट सांगून स्वामीजी मानवी जीवनाच्या सर्वांगाचा वेध घेतात व अनेक उदाहरणे देऊन आपल्या मार्मिक शब्दात साधकाला त्याच्या ईश्वरप्राप्तीच्या मार्गातल्या अडथळ्यांची जाणीव करुन देतात.

पुस्तकातल्या 'यज्ञ' हा लेख जेव्हा वाचायला सुरुवात केली तेव्हा वाचता वाचता स्वामीजींसाठी आपसूकच तोंडातून शब्द निघाले- ***किन शब्दो में दूं परिचय इस कोहिनूर हिरे का । जिनका हर शब्द वचन सिध्द है ।***

वाचकाला महान ऋषींचे वंशज तसेच 'अमृतस्य पुत्राः' अशा उपमा देऊन गुरुमाऊलींनी लेखाला सुरुवात केली आहे. यज्ञाची व्यापक संकल्पना आपल्या ओघवत्या शैलीत मांडलेली आहे व वाचकाला एक संदेश दिला आहे की, आपणा सर्वांना याज्ञिक व्हायचे आहे. स्वतःसाठी, मानव मात्रासाठी समस्त सजीव निर्जीव सृष्टीसाठी, सृष्टी चक्रासाठी आणि ईश्वरप्राप्ती साठी. याज्ञिक होण्यासाठी तसेच अमृतस्य पुत्रा या उपमेस पात्र होण्यासाठी साधकाला पाच यज्ञांचे सखोल ज्ञान स्वामींच्या पुढील लेखातून मिळते.

तुमची आंतरीक स्थिती नसेल तर तुम्ही अधिकारी पुरुषांना ओळखू शकणार नाही असे शेवटच्या गुरुनिंदा या लेखात स्वामीजी सांगतात. अधिकारी पुरुष, गुरु यांचे कुठलेच कार्य हे विनाकारण नसते. त्यांच्या प्रत्येक कार्यामागे एक ईश्वरीय रहस्य असते. परंतु जो कोणी अज्ञानी परोक्षभावे गुरुनिंदा करतो, गुरुनिंदा ऐकतो तसेच जो गुरुंच्या कार्यावर शंका घेतो, त्यांना गुरुमाऊली एक इशारा देतात की, 'तुमच्या तर्क, सद्गुण, साधना आणि तपस्येवर गुरुनिंदा पाणी फिरवून देईल.'

गीता अर्थासह वाचा असे सांगणारे माझे हे आत्मज्ञानी गुरु. रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकाचे सेवाकार्य व जीवावर उदार होऊन जरुर पडल्यास प्राणार्पण करुन देश, समाज, धर्माची करीत असलेली सेवा पाहून ते गीता जगतात. त्यांनी गीता आपल्या जीवनात उतरवली आहे असे पूर्ण उद्गार काढून स्वामीजीं म्हणतात, ''असे स्वयंसेवक गीता जगतात.'' स्वामीजींनी आपल्या पुन्हा एका नवीन पुस्तकाची सुरुवात केली आहे. स्वामीजींच्या प्रश्न आमचा उत्तर तुमचे (भाग ४) पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय सुंदर आहे. अनेक सामाजिक, राजकीय,राष्ट्रीय प्रश्न आहे जे कोणत्याही संवेदनशील माणसाला व्यथित करतात. मुखपृष्ठावर जणू सगळीकडे असा हा व्यथित करणारा निराशेचा अंधार दाटला आहे आणि अशावेळी एका दिव्याने दुसरा दिवा लावला जात आहे व त्याखाली एक अर्थपूर्ण ओळ - 'असीम अंधेरे को कोसो मत एक दिया और जलाओ'

काहींना गीता वाचण्यास सांगतात तर काहींचे कार्य बघून ते गीता जगतात असे सांगतात यावरुन समाजात वावरणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांबद्दल त्यांच्या आचार-विचारांबद्दल स्वामीजींचे किती सखोल ज्ञान याची या ठिकाणी कल्पना येते. स्वामीजींच्या पुस्तकांतून वाचकाला भरपूर ज्ञान मिळते तसेच स्वामीजीनी सामान्य माणसाला, साधकाला हा संसाराचा भवसागर पार पाडण्यासाठी पदोपदी मार्ग दाखवतात. त्यांना योग्य दिशा देण्याचं काम करतात. ***गुरु हि निरव का उज्वल सितारा है । गुरु हि भव जलसे दिखाते किनारा है।।***

पुस्तकातील पहिलाच लेख आहे 'मी जबाबदार आहे' हा पूर्ण या विषयाला धरुन आहे. तसेच माणसाच्या एका वृत्तीचा उल्लेख या लेखात आहे तो असा की, आपल्या दुःखाला दुसरा कोणी जबाबदार आहे ही मानसिकता. जे घडतेय त्याला प्रत्यक्षरित्या व अप्रत्यक्षरित्या तुम्हीच जबाबदार असे परखडपणे सांगताना स्वामीजी पुढे लिहितात की, जोपर्यंत आपण हे समजून घेत नाही, परिवाराच्या समाजाच्या व देशाच्या नव्हे तर वैश्विक पातळीवरील सगळ्याच समस्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मी स्वतःच जबाबदार

आहे तोपर्यंत काहीही सुधारणा होणार नाही. जे काही चांगले घडत आहे ते माझ्यामुळे, मी पण त्यात पूर्ण सहभागी आहे व जे काही वाईट घडत आहे ते पण माझ्यामुळेच मीच त्याला जबाबदार आहे. अगदी ३०२ कलम लावण्याइतके जबाबदार.

गुरुकुल पध्दती नष्ट झाली. ज्ञानापेक्षा मार्कांना जास्त महत्त्व आले. संस्कृतीविहीन जीवन, मूल्यविहीन शिक्षणपद्धती आपल्याकडे राबविली जात आहे. शिक्षणपध्दतीने देशात अंधःकार पसरला आहे तेव्हा स्वामीजी अगदी पोटतिडकीने सांगतात की, या भीषण अंधःकाराचे भय वाटत असेल, भविष्याची चिंता असेल तर उठा. उभे रहा, चला, अजून एक पणती पेटवू या ।

आत्महत्येला दुष्प्रेरणा देणारे वा हा लेख तर अगदी सर्वांगांने कंपित करणारा आहे. एखादा विद्यार्थी आत्महत्या करतो तर ही आत्महत्या नसून तुम्ही, आम्ही व आजच्या समस्त शिक्षण पध्दतीने केलेला हा खून आहे. कलम ३०९ लागू व्हावे एवढे आपण गुन्हेगार असे अगदी धारदार उद्‌गार काढून पुढे स्वामीजी सांगतात की, आम्हाला गुरुपद पाहिजे नोकरपद नको. हे सरकारला ठणकावून सांगण्याची तुमची वृत्ती आणि हिंमत पाहिजे आणि त्याचबरोबर या सर्व गुन्ह्यांना जबाबदार असलेल्या माणसाला स्वामीजी इथे एक प्रश्न विचारतात की, ईश्वराला गुरुंचाही गुरु म्हटले आहे त्याच्यासमोर तुम्ही उभे राहू शकाल ?

देशधर्माच्या परिस्थिती बद्दल स्वामीजी किती जागरुक, संवेदनशील आहेत याची कल्पना या पुस्तकातील त्यांच्या प्रत्येक शब्दावरुन येते. एखाद्या समाजशास्त्रज्ञाप्रमाणे त्यांनी सर्व बाजूंनी आपले विचार इथे मांडले आहेत. प्रत्येक क्षेत्रात कुठे काय चुकते आहे यावर नेमके भाष्य केले आहे. संविधान या विषयावरील लेख वाचून तर स्वामीजींच्या अफाट विद्वतेची कल्पनाही करवत नाही. अपराध व अपराधी आणि यांच्याबाबत स्वामीजींची अपेक्षित न्यायव्यवस्था या आणि यासारख्या असंख्य गोष्टी यांचे शब्दात वर्णन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.

संविधान ! सावधान भाग १ ते ५ हे एकापेक्षा एक दर्जेदार लेख आहेत. वाचकाला अगदी सुन्न करणारे. आपल्या देशात नियम, कायदे आणि न्यायव्यवस्था ज्या पध्दतीने हाताळले जातात ते बघून स्वामीजी म्हणतात की, आमचे कायदे कानून, आमची न्यायपध्दती ही चक्रवाकाची जोडी आहे. ही पक्ष्यांची जोडी रात्रीच्या अंधारात एकमेकांना पाहू शकत नाहीत. त्यामुळे अगदी शेजारी शेजारी असूनही ते विरह वेदनेने एकमेकांना साद घालीत राहतात, सूर्योदय होईपर्यंत !

'आत्मवंचना' तुम्ही स्वतःला दुखावता, तुम्ही स्वतःच्या अंतरात्म्याला दुखावता, आपल्या ईश्वराला दुखावता ! गीतेतही म्हटले आहे तुम्हीच तुमचे मित्र व उध्दरकर्ता, तुम्हीच तुमचे शत्रू आणि पतनकर्ता! त्यामुळे स्वामीजी इथेही एक प्रश्न विचारतात की, जरा आत डोकावून बघता जीवनाच्या विविध क्षेत्रांत तुम्ही स्वतःची आत्मवंचना तर करीत नाही ना ? ते घोर अक्षम्य पाप तर करीत नाही ना ?

सदोष शिक्षण पध्दतीच्या संदर्भात पुढे स्वामीजी लिहितात की, ज्या देशाचे लोक त्यांचा इतिहास विसरतात त्या देशाचा भूगोल बदलायला वेळ लागत नाही. आम्ही इतिहासापासून काही धडा शिकलो नाही. फक्त शाळा कॉलेजमध्ये इतिहासाचे धडे शिकलो.

मानवाच्या हितासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक त्या त्या सर्व गोष्टींबद्दल स्वामीजी अगदी जागरुक असतात. त्याच कारणाने की काय मूळ लेखमालेपेक्षा एक वेगळा विषय घेतलाय. कार्यकर्त्यांसाठी कार्य दिसावे पण कार्यकर्ता दिसू नये. तो कार्यकर्ता यशोदेसारखा असावा. कार्यकर्त्याने पुष्पदन्त व संत तुलसीदासांचे अनुकरण करावे. कार्यकर्ता बहुश्रुत असावा पण बोलण्यात मितभाषी असावा. कार्यकर्ता पाण्यासारखा असावा. कार्यकर्त्याकडून एवढ्या समर्पक अपेक्षा स्वामीजींनी इथे व्यक्त केल्या आहेत. डोळ्यात तेल घालून

जागत राहायचे की कुंभकर्णी निद्रा घ्यायची याचा विचार करा. रात्र वैऱ्याची आहे राजा जागा रहा असे बोलून स्वामीजी इथे थांबतात.

जशी आई आपल्या बाळाला मांडीवर झोपवून प्रेमाने डोक्यावर हात फिरवत फिरवत त्याला त्याच्या वयानुरुप गोष्टी सांगून जीवनाचे धडे देत असते, स्वामीजींनी आपल्या चारही पुस्तकाच्या माध्यमातून आपल्याला ज्ञानामृत पाजले आहे. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे डोळे मिटत नाहीत. त्यांनी कुठलीच उपदेशकाची भूमिका घेतलेली नाही. आपले शुभहितचिंतक , जिव्हाळ्याचे म्हणून आपुलकीने आपल्याला आपल्या चुका लक्षात आणून दिल्या आहे. स्वामीजींच्या ओघवत्याशैलीने पुस्तक वाचतांना जडपणा जाणवत नाही. कंटाळा येत नाही. डोळे मात्र नक्की उघडतात हे तितकेच खरे. पुस्तकातील प्रत्येक शब्द वाचकांसाठी नवसंजीवनी देण्यास समर्थ आहे. शेवटी परमपूज्य गुरमाऊलींना शतशः वंदन करुन चार ओळी लिहिते.

कैसे गुणगान करु आपका, शब्दों की औकात नहीं ।
सागर को गागर में भरना , मेरे बसकी बात नहीं ।।
चाहा जो वो कह ना सके, शब्द कहा ये मेरे पास में,
ढूंढे मगर ना मिल सके, जो कहते गुरु की तारिफ में ।
हुई हो हमसे त्रुटि, कुछ न हृदय मे धरिए,
अब हर एक बाधा से सब भांति हमे उबारिए।

– शुभांगी पाटील, रावेर

६. एक मित्राचे मनोगत

भालचंद्र पाठक

पत्रारंभ दिनांक : ४/३/२०१७
फाल्गुन शु. ६/७ शके १९३८ शनिवार.

विद्यादेवी मुपास्महे ।
प्रति,
परम आदरणीय स्वामीजी,
कोटी कोटी प्रमाण. वि.वि.

आपण गुरूंच्या आणि भगवंताच्या शोधासाठी माझ्या घरून पंचपंच उष:काली निघालात, थोड्या अंतरापर्यंत मी सोबत होतो. नंतर आपण खरोखर मजेत, आनंदात, मस्तीत पुढचा प्रवास सुरू केलात आणि मी? त्यानंतर जो पाठ फिरवली, ती अगदी अलिकडे आपण बेटावदला आलात, तेव्हाही तोंडदेखली भेट घेतली. त्यात आनंद नव्हता, ओढ नव्हती. कसलं आकर्षणही नव्हतं. नव्हती कधी जिज्ञासा, शंका......

आपण संन्यास स्वीकारलात आणि मी तुम्हाला विसरायचा हेतूपूर्वक प्रयत्न केला. कधी पत्र नाही. भेटीतही फारसं प्रेम नाही. मला ते कधी आवडलंच नाही. स्वीकार्य झालंच नाही.

अगदी आपण माझ्याकडून निघालात त्या दिवसापासून आजचं हे पहिलं पत्र! मनापासूनचं. जे वागलो त्याची खंत व्यक्त करण्यासाठी. स्वामीजी मी फार चुकलो. का असं वागलो कळतच नाही. पण आज जेव्हा मी विचार करतो, लक्षात येतं की अगदीच वेडेपणा होता. का असं वागलो?

स्वामीजी माझं अनहित मी केलं. तुकोबांचा आधार घेतला तर; ''तेथ कुणाचे काय गेले? । ज्याचे त्याने अनहित केले!'' मी तुमच्या सहवासात असतो, तर आज मलाही थोडा मुक्तीचा वारा, आनंद मिळाला असता. मी कळवळ्याने लिहितो, मी चुकलो आज माझे डोळे खरोखर उघडले. मला क्षमा करा. आपल्या श्रीचरणांवर माझे कोटी कोटी प्रणाम.

आपण कृपावंत होऊन जी ३/४ पुस्तके भेट दिलीत, तेवढीच वाचली. कधी आपलं नवं पुस्तक आलं आहे ते घ्यावं, मागवावं, वाचावं, त्यावर विचार करावा. असं कध्धीच वाटलं नाही. खरं तेच कबूल करतो.

कां? मी असं का वागलो. माझ्या डोळ्यांवर पट्टी होती. लहानपणापासून तुमच्या सहवासात होतोच. सहाध्याही होतो. वाटायचं, ''याची बुद्धिमत्ता प्रखर आहे. वाचन अफाट आहे. स्मरणशक्ती विलक्षण आहे. कल्पकता दांडगी आहे. समजावून सांगण्याची कला अप्रतिम आहे. माणसं जोडण्याची कला आहे. संस्कृतीतला अभिजातपणा अंगी बाणलेला आहे.'' जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते सगळे चिंतनाचा विषय आहे. याला अशक्य असं काहीच नाही.''

सुरवातीची पुस्तकं वाचली. थोडा प्रभावित झालो. पण त्यात विशेष काही घडलं असं वरील कारणांनी खरंच कधी वाटलं नाही. वाटायचं असं यानं लिहिलं नसतं तरच नवल घडलं असतं.

या सुरवातीच्या ४-५ पुस्तकांचा अनुभव मला नवीन नव्हता. वर्ष- सहा महिन्यांनी जेव्हा जेव्हा आपली भेट होई. नवीन काय वाचलं त्याची चर्चा होई. माझे आवडते लेखक रणजित देसाई, कवी विंदा,

कुसुमाग्रज, वसंत बापट यांचं कोणतेही पुस्तक हातात नसतांना जी सोदाहरण चर्चा होई. अगदी पक्कं आठवतं स्वामी नंतर, श्रीमान योगी, राधेय या कादंबऱ्यांवर बोलतांना ''एकाच गृहिणीने केलेल्या सगळ्या भाकरी जशा सारख्या, तश्शीच ही पुस्तकं वाटतात!''

आता मला सांगा हा अनुभव ज्या भाग्यवंतांनं घेतला, त्याला हा अनुभव - विषय वेगळा असला तरी विस्मय कसा वाटावा? मी प्रभावित झालो तरी नवल मात्र खासंच वाटलं नाही. मग आता असा काय बदल घडला की, 'डोळे उघडले', क्षमा याचना करण्याची भाषा आपसुक झाली. काय असं घडलं?

''.... जर तुमची साधनेची स्थिती खरोखरच इतकी चांगली झाली, चिक्षुर चामराचा वध झाला तर खूप गोष्टी बदलतील. कारण आत्मज्ञानाची स्थिती आता जवळ आहे. चेहऱ्यावर चमक येईल. ललाटावर तेज येईल, वाणीमध्यें आकर्षकता येईल, तुमच्या अवती-भोवतीच्या सगळ्यांना तुम्ही त्यांच्यापेक्षा थोडे 'वेगळे' वाटायला लागाल. आत्तापर्यंत ते सारे तुम्ही त्यांच्यापैकीच एक असे धरून, समजून चालत होते, वागत होते. हा आपलाच आहे, आपल्यासारखाच आहे, वेगळा नाही. त्यामुळे त्यांच्या वागण्यात, बोलण्या-चालण्यात वेगळेपणा नव्हता, चिक्षुर-चामर वधानंतर तुमच्यातला बदल त्यांना जाणवायला लागेल आणि त्याचबरोबर त्यांच्या वर्तन व्यवहारात.....''

(रात्रंदिन आम्हा.... पृष्ठ १६४)

तुमच्याच शब्दात तुमचं वर्णन. तुमच्याच फुटपट्टीने तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे मापन. आता मी तुमच्याकडे आकर्षित होण्याचे प्रमुख कारण . फक्त पान नंबराचा निर्देश करूनही वरील परिच्छेद सांगता आला असता. पण माझं म्हणणं सुस्पष्ट करण्यासाठी, निश्चित तेच सांगण्यासाठी मला परिच्छेद लिहिण्याचा मोह आवरला नाही. किती किती लिहू? मला व्यक्त करायला शब्दांची साथ नाही आपल्याबाबत ... आता सर्वच बाबतीत खूप खूप बदल झाला आहे. तो खूप मोहवून टाकणारा आहे. बोलण्यातही (प्रवचनातही) खूपच संमोहन आहे. सरस्वती पाठीशी उभी आहे. शब्दही अर्थवाही असतात. उदाहरण तर अगदी समर्पक, सार्थ, वेचक, निश्चितार्थ स्पष्ट करणारे वाटतात. त्याचच संमोहन असतं की, तास-दोन तास केव्हा संपले याचं भान राहू नये. का भक्ती करावी? तर सजातीय वस्तूतच समरसता, एकजिनसीपण असते. पाण्यात दगड लोखंड एकजीव होत नाही तर पाण्यात पाणीच एकजीव होते.... हा दृष्टांत मी माझ्या प्रवचनात कित्येक ठिकाणी वापरला. हाच काय असे अनेक! आणि आपल्या पुस्तकातले काही विषयही घेतले.

आता मी तरी काय करू? आपण स्वामी सवितानंद. सविता म्हणजे सूर्य आणि मी 'भालचंद्र'... सूर्यकिरण परावर्तित करणं हे तर चंद्राचे कामच. पण हे काम करतांना दाखले अथवा विषय मी चोरले नाहीत. तर आपला आदरपूर्वक उल्लेख करून पुस्तकांचे संदर्भ दिलेत!

आपल्या मुखातून शब्द नाहीत, अमृत स्त्रवते. ओघ असूनही शांत, समाधान वाटतं. विषय पटविण्यासाठी कसला अभिनिवेश नसतो. नाट्यीकरण नसते. शब्द अतिशय चपखल असतात. विषय प्रकटीकरण सहज सुलभ असते. दाखलेही नेमकं तेच व्यक्त, प्रकट करतात. मधूनच विनोदही असतो पण कोणाला चिमटे घेऊन घडत नाही, तर सहजपणे अंतर्मुख करण्यासाठी असतो.

एखादी संगीताची मैफल ऐकावी. रागदारीचा कार्यक्रम ऐकावा तसा अनुभव येतो. किती लिहू? पूर्वीही हे सगळं होतंच. पण त्यात न्यूनता, अपूर्णता जाणवे. आता काही मिळवायचे आहे, म्हणून नसून आत्मतृष्टीचे शब्द आहेत. मनाच्या खोल गाभाऱ्यातून ते उमटतात. त्या शब्दांना नाद आहे. म्हणून ऐकणाऱ्यालाही ते शब्द तृष्टी देतात, समाधान देतात. सहाजिकच आदरभाव वाढतो. असा हा गोड अनुभव वारंवार यावा असा आग्रह निर्माण होतो.

आता जे नवं मोठं पुस्तक वाचकांच्या भेटीला आलं आहे ते तर विलक्षण आहे. (सहज आठवलं, ११ वी S.S.C. परीक्षेला आठ विषय आपल्यावेळी घ्यावे लागायचे. सात विषयांत उत्तीर्ण होणं अनिवार्य असे. मी Special Geography घेतला आणि त्यातच अनुत्तीर्ण झालो! तर सांगायचं असं की ते भूगोलाचं पुस्तक पाहून मी रडलो. आज 'रात्रंदिन...' तेवढंच मोठं असूनही पुस्तक हातात घेतांना आनंद होतो.)

अध्यात्म, तत्त्वज्ञान, धार्मिक विषयांवरील कांही ग्रंथ, उदा. भागवत मी वाचलं. हातावेगळं केलं. पण रात्रंदिन वाचतांना वेगळीच अनुभूती आली. एक झपाटलेपण जाणवलं. विषय नवा होता. पूर्वानुभव वाचण्याचा किंवा अनुभवण्याचा शून्य होता. सप्तशती हा एक बहुतेक यजमानाकडे वाचण्याचा छोटेखानी (७०० श्लोकांचा) ग्रंथ वाटे. किती कमीत कमी वेळेत पाठ पूर्ण होतो, याची ओढ लागायची, मग त्यातल्या अर्थाकडे – काहीवेळा तो जाणवला तरी लक्ष कोण देतो? आणि याचा अर्थ काय असेल तो असो. हा मुख्य सांसारिक, ऐहिक लाभासाठी, नित्य अनुष्ठानासाठी, इच्छापरिपूर्तीसाठी वाचायचा ग्रंथ वाटे. तो व्रतस्थपणे 'वाचण्याचा' तर भागवत खळखळून हसविण्यासाठी 'सांगण्याचा' ग्रंथ वाटतो. दोघांचेही उद्दिष्ट वेगळे, त्यात अनुस्थूत असलेले, गर्भित अर्थ वेगळे याचं भान या ग्रंथाने दिले हे खरेच.

१२ फेब्रु. हा वाढदिवस चि. विद्यार्थी नंदू बाविस्कर, त्याचा भाऊ चंदू बाविस्कर नित्य नियमाने फोन करणारच. असाच २०१७ च्या १२ फेब्रु. ला नंदू (नंदराजे – माझे संबोधन) आणि पुस्तकाचा विषय निघाला. म्हणाला, मी By Post पाठवितो. म्हटलं खूपच आनंद. मला तो ग्रंथराज घ्यायचा आहेच. त्याने इच्छा पूर्ण केली आणि वाढदिवसाची भेट म्हणून पैसेही घेतले नाहीत ते वेगळेच.

आत्तापर्यंत जे जे वाचलं, त्याचा अनुभव व आत्ताचा ह्या वेळच्या वाचनाचा अनुभव पूर्णतया वेगळाच होता. पुस्तकं आजवर एका बैठकीत वाचून संपविली. हे पुस्तक पूर्णच होईना. आत्ताही पृष्ठ ३९४ वर विश्राम असतांना पत्र झडझडून लिहावसं वाटलं म्हणून पेन उचलला... हा अनुभव म्हणजे, वाचतांना एखादा विचार, नवं काही जाणवलं तर तिथेच पुस्तक बंद करून मी विचार करीत बसतो. हा अनुभव नवीन आहे, खोलवर भिडणारा आहे, विचार प्रवण करणारा आहे.

काही सुंदर विचार जाणवले तर पुस्तकात पेन्सिलीने खूण करून समासात 'सुं द र' लिहितो. स्वामीजी या सुंदर शब्दाने सगळं पुस्तकच भरलं आहे. काही सहज हाताशी लागलेली उदाहरणे. –

१) कबंधाचा अत्याचार – विश्वामित्राची कथा पृष्ठ २२५
२) पांडवांकडचे शंख – इतर शंखांपेक्षा वेगळे पृष्ठ २३७
३) 'श्री' चे अर्थ – प्राणशक्ती. सुंदर – पृष्ठ ३०६
४) वेद–अवेद, विज्ञान–अविज्ञान, मित्र, वरूण पृष्ठ ३२०
५) आज्ञाचक्राच्या ठिकाणी असणारा तृतीय नेत्र पृष्ठ ३५१
६) सहा विकार, सहा ऊर्मी, तीन दशा –वर्णन पृष्ठ ३९०

अशी कित्येक अगणित उदाहरणं लक्षात घेऊन निरतिशय आनंद प्राप्त झाला.

सबंध पुस्तकात संस्कृत श्लोक, सप्तशतीचे श्लोक, दृष्टांत, पुराणकथा, व्युत्पत्तीने होणारे अर्थ, अर्थाच्या मुळापर्यंत नेणाऱ्या व्युत्पत्ती, विचार, नव्या कल्पना यांचा अप्रतिम वर्षावच आहे.

हे पुस्तक म्हणजे अविस्मरणीय आनंद, सात्त्विक आनंदाची सर्वोच्च अनुभूती, नवनवीन कल्पनांचा अविरत प्रवाह, खूप खूप परमोच्च सुखानुभूती, आनंदाची परिसीमा.. वाचकाला अंतर्मुख करणारा आनंद, प्रत्येकवेळी नवा अर्थ प्रतीत होणारा म्हणून नवनवोन्मेषशाली,श्रेष्ठ ग्रंथ आहे.

स्वामीजी, जे सांगायचं होतं. बहुतेक सांगून – लिहून झाले मनातलं कागदावर किती उतरले कुणास

ठाऊक! पण आता हलकं हलकं वाटतंय.

झालं ते झालं. चूक ती चूकच असते. क्षमा हा उपचार असतो. क्षमा याचनेनंतर दोन्ही बाजूकडून पुढाकार घेतला गेला तर मार्ग निघतो. पुन्हा एकदा माझ्या वागण्याबद्दल पश्चात्ताप होऊन सरळ मनाने मी शरणागत झालो आहे.

स्वामीजी, पुस्तक वाचतांना नवल एक वाटते, एवढे ज्ञान कसे मिळवले! ते सगळे या ग्रंथाच्या निमित्ताने कसे प्रकट केले? वाचून केवळ आश्चर्य वाटते. प्रत्येकच शब्द नवीन, शस्त्रास्त्रांची नावे, ती देणारी देवता, त्याचं स्पष्टीकरण हे सगळे स्मरणातून जाता जात नाही. एवढं ज्ञान प्रकट करणारे माझे पूर्वाश्रमीचे जिवलग मित्र आहेत या भावनेने सुखावतो. तुमची पुण्याई, प्राप्त केलेली पुण्याई अगाध आहे. पुण्याईवरून आठवले सध्या मला आपल्या तीर्थरूपांची आठवण येते.

स्वामीजी, खूप लिहिले, आता शांत वाटते. आता पत्राचा शेवट (दि. ८/३/२०१७, बुधवार) करताना माझ्या मनातल्या सगळ्या भावना व्यक्त करण्यासाठी गीर्वाण भाषेचा आधार घेतो. महर्षी व्यासांच्या शब्दात माझ्या भावना व्यक्त करतो.

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देवदेव।।
त्वमेव शरणं मम। इत्यलम्।।

सर्वथैव तुमचाच शरणागत,
भालचंद्र पाठक

।। एक तरी मुलगी शिकवा।। एक तरी झाड लावा, जगवा।।

७. साधना पथावर चालताना चुकते कोठे?

- प्रा. किसन माने

स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजपुरुषाचे केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांप्रदायीक स्वातंत्र्यही शिक्षणाच्या माध्यमातून येणे अपेक्षित होते. अन्य क्षेत्रात हे बदल घडत असले तरी तुलनेने धार्मिक व सांप्रदायीक क्षेत्रात यांची वानवा आहे.

कबीर, तुकाराम, गाडगेबाबा या सारख्या संतांनी या क्षेत्रात जनजागृती केली तरीही अजून बरेच काम बाकी आहे. पाण्यात राहुन माशाशी वैर कशाला? अशा विचारानी अनेक प्रज्ञावंतांनी मौनच धारण केल्याच्या पार्श्वभूमीवर पूज्य स्वामीजींनी या अपप्रवृत्तीच्या विरोधात बंडच पुकारले आहे. स्वामीजींच्या अनेक प्रकाशित ग्रंथांपैकी ''साधनापथावर चालताना चुकते कोठे?'' हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या लिखाणात साधकांची हळूहळू धार्मिकतेकडून अध्यात्मिकतेकडे वाटचाल व्हावी अशीच त्यांची तळमळ आहे.

धार्मिक क्षेत्रातील साधकाची साधना ईश्वरप्राप्तीसाठीच असते किंबहुना तो त्याचसाठी गुरूंच्या सानिध्यात राहून साधना करीत असतो. या वाटचालीत गुरूंची भूमिका किती महत्वाची असते हे स्वामीजींनी पहिल्याच प्रकरणात विशद केले आहे. शाळा खोटी, गुरूजी खोटे, विद्यार्थीही खोटे अशी अवस्था निर्माण होऊन सर्वच पापाचे धनी होताना पाहून स्वामीजी जागोजागी व्यथित होताना दिसतात. ईश्वरप्राप्तीसाठी संन्यासाश्रम श्रेष्ठ की गृहस्थाश्रम श्रेष्ठ हा वाद घालण्यापेक्षा सारासार विचारांती निवडलेला कोणताही आश्रम श्रेष्ठ असे त्यांचे मत आहे. स्वभावाशी विपरीत मार्गाची निवड ही आयुष्यभराची शिक्षा असते. आज अनेक संन्यासी केवळ कुटुंबियांवरील रागापोटी रूसून, घरदार-प्रपंच सोडून कुणाच्यातरी आश्रमात आपल्या इच्छेविरूद्ध दाखल झाले आहेत, अशांच्या वाट्याला ईश्वराऐवजी पश्चातापच येतो.

भगवद् गीता ही सांगते की अनेक डगरींवर हात ठेऊ नकोस, त्यातून हाती काहीच लागणार नाही. आपले एकच विहीत कर्म निष्ठेने पार पाडले तरी ईश्वरप्राप्ती होईल. मग ते कर्म संन्यासाश्रमात राहून करा किंवा गृहस्थाश्रमात राहून करा. दोन्ही आश्रम ईश्वरप्राप्तीसाठी श्रेष्ठच आहेत. संन्यासाच्या नावाखाली मोठ-मोठे प्रपंच उभे करून अनेक मठाधिपती केवळ साधकांची आणि सामान्य जनतेची दिशाभूल करत असलेले दिसतात. पण हे सारे व्यर्थ आहे अशीच स्वामीजींची धारणा आहे.

मध्यंतरी माझ्या एका जुन्या विद्यार्थ्याची भेट झाली. त्याने आपण आपल्या मुलाला आळंदीच्या किर्तन महाविद्यालयात घातल्याचे सांगितले. वारकरी संप्रदायाची थोर परंपरा या महाविद्यालयाला लाभली आहे. त्यासाठी संत विष्णुबुवा जोग महाराजांपासून अनेकांनी मोठा त्याग केला. अनेक महात्म्यांनी वैराग्यशील राहून तेथे सेवा दिली, म्हणून महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे ते प्रेरणास्थान झाले. मी सहज त्या विद्यार्थ्याला विचारले, ''हेच क्षेत्र का निवडले?'' त्यावर त्याचे उत्तर मात्र निराशा करणारे होते, ''आज कुठे नोकऱ्या मिळत आहेत? त्यापेक्षा किर्तन-प्रवचन करून त्याला चरितार्थ चालविता येईल. शिवाय समाजात मान-सन्मान

मिळतो तो वेगळाच!'' स्वामीजींनी नेमक्या याच प्रवृत्तीवर बोट ठेवले आहे. इथे साधना पद्धती स्वीकारताना आपला स्वभाव, ईश्वराविषयीची ओढ या गोष्टींना कुठेही स्थान नसून केवळ बेकारीवरचा सोपा उपाय म्हणून पाहिले जाते. स्वामीजींनी मात्र या क्षेत्रातील अराजकावर अचूक हल्ले केले आहेत. पारमार्थिक असूनही परमार्थाच्या शुद्धीकरणाचा प्रयत्न म्हणून स्वामीजींनी व्यक्त केलेली मते स्वागतार्हच आहेत. परमार्थाचे वाडाबंद परमार्थात रूपांतर करण्यामध्ये अर्थातच वाड्याच्या गुरूंचीच भूमिका अहम् आहे. हे गुरू की व्यापारी? हा कळीचा प्रश्न स्वामीजींनी उपस्थित केला आहे. परमार्थाची भूक असलेला भाविक गुरूच्या शोधात असतोच. अशा साधकाला आपल्या जाळ्यात ओढण्याची जणू स्पर्धाच या क्षेत्रात सुरू आहे. भूलथापा देऊन अशा शिष्यांची जमवाजमव करणे, गुरूदक्षिणेच्या नावाखाली सर्व सुखांची त्यांच्याकडून मागणी करणे, ईश्वराकडे जाण्याचा मार्ग फक्त माझ्याच संप्रदायातून जातो, इतर सारे लबाड व खोटे आहेत हे साधकांच्या मनावर बिंबवण्याचे कौशल्य यांच्या वाणीत, राहणीत ठासून भरलेले असते. एवढे सगळे असले की साधकांना आपल्या जाळ्यात ओढणे सहज शक्य होते. पुढे इच्छा असूनही त्यातून बाहेर पडता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

साधनेच्या प्रांतातील अपप्रवृत्तींचा समाचार घेता-घेता सच्च्या साधकांसाठी स्वामीजींनी या ग्रंथात मौलिक मार्गदर्शन केले आहे. जागोजागी येणाऱ्या अडथळ्यांचे स्वरूप सांगून त्यांच्या निराकरणाचे उपायही ते सुचवतात. थोडीशी ईश्वरीकृपा झाल्याचा भास झाला की मनातील अहंकाराला कोंब फुटू लागतात. मी असा - मी तसा म्हणून इतरांपेक्षा वेगळा भासवत असताना मान-सन्मान, आदर-प्रशंसा, गृहस्थांकडून सेवेची अपेक्षा करू लागतात. आता पंचमहाभूते माझ्या स्वाधीन झाली असा आव आणून त्यांनी मला पीडा देण्याऐवजी केवळ सुख आणि आनंदच द्यायला हवा असा अट्टाहासही सुरू होतो. स्वामीजींनी त्यांच्या माहितीतील अशा साधकांचे कसे वस्त्रहरण केले याची उदाहरणे मोठी मनोरंजक आहेत.

साधनेच्या प्रांतात ज्या मुळी समस्याच नाहीत त्यांचा मोठा बाऊ साधकांकडून केला जातो. उदा. साधनेत मन एकाग्रच होत नाही ही एक सर्वांना भेडसावणारी समस्या आहे. अशा वेळी चित्ताचे शुद्धीकरण (सफाई) करून प्रथम ते निर्मळ करावे, चंचल मन आपोआप स्थिर होईल असा सल्लाही स्वामीजी देतात. या संदर्भात भगवान श्रीकृष्णाच्या *'युक्त आहार विहारस्य युक्त चेष्टस्य कर्मसु।'* या वचनाची आठवणही ते करून देतात. साधकाला छळणाऱ्या बिडालाक्ष, असिलोमादी सोळा राक्षसांची फौज त्यांनी साधकांसमोर उभी केली आहे. हे सोळा राक्षस म्हणजेच साधका समोरील प्रमुख अडथळे.

साधनेत सगुण साकार पूजा अपेक्षित असताना साधक केवळ साकाराचीच पूजा करताना आढळतात हे स्वामीजींच्या नजरेतून सुटलेले नाही. आराध्य देवतेची प्रतिमा आणि मूर्ती अचेतन समजून पूजादी कर्मकांडे मन:पूर्वक केली जातात. अशा पूजेबाबत संत कबीर म्हणतात -पाषाण पुजे तो पुजीये पहाड। ताते चक्की भली पीस खाये संसार। पाषाणाचीच पूजा करणार असाल तर पर्वताची पूजा करा परंतु त्यापेक्षा जात्याचा दगड बरा निदान त्यातून पीठ तरी मिळते. देवतेच्या गुणाबाबत तर साधकांची अवस्था दयनीयच आहे. एकाही गुणाचा अंगिकार न करता राम, कृष्ण, हनुमान, दत्त भक्त म्हणवून घेणाऱ्यांची मांदियाळी बघितली म्हणजे वरवरचा जप, गंध, अक्षता, जटा, माळा आणि पेहराव करून हे लोक स्वत:ची फसवणूकच करून घेत असल्याचे स्वामीजी प्रतिपादन करतात.

साधनेतील अडथळ्यांची स्वामीजींनी विस्ताराने चर्चा केली आहे. तमोगुण, रजोगुण आणि सत्व गुणांची प्रतिके म्हणून स्वामीजींनी रामायणातील संदर्भ दिला आहे. सीता शोधात हनुमंताला आडव्या आलेल्या सिंहीनी, लंकिनी आणि सुरसा ही अनुक्रमे रज, तम आणि सत्वगुणांची प्रतिके आहेत. शुद्ध सत्वगुणही ध्येय

प्राप्तीत अडथळाच ठरतो कारण त्यातून सात्विक अहंकाराची बाधा होऊ शकते. म्हणून तमोगुणाचा सर्वस्वी त्याग करून रजोगुण सत्वगुणाभिमुख केला तर ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुकर होतो. यासाठी पूर्ण वैराग्य, नम्रता, जडत्वाचा त्याग, ईश्वर समर्पण आणि ज्ञानी सत्पुरूषांचा सत्संग या सद्‌गुणांना साधकाच्या जीवनात प्राधान्य असावे लागते. या कसोट्यावर उतरणारा विरळाच असतो आणि तोच ईश्वराप्रत पोचू शकतो हेच या ग्रंथाचे मुखपृष्ठ सांगत आहे.

''साधना पथावर चालताना चुकते कोठे?'' हा ग्रंथ स्वामीजींच्या आंतरिक तळमळीचे फलित आहे. साधकांची वाटचाल अधिक आत्मविश्वासपूर्ण व्हावी व त्यांचा बेडापार व्हावा म्हणून हा ग्रंथ ''दीपस्तंभा'' प्रमाणे साधकांना चिरकाल मार्गदर्शन करीत राहील.

– प्रा. किसनराव माने.

८. नांदा सौख्य भरे

– प्रा. किसन माने

स्वामी सवितानंदानी ऐन उमेदीत संसाराचा त्याग करून संन्यस्त जीवन स्वीकारले. अर्थात उच्च विद्या विभूषित असल्याने त्यांनी हा निर्णय विचारपूर्वकच घेतला असणार यात शंका नाही. संसारिक जीवन दु:खमुलक असल्याने अनेकांनी त्याचा त्याग करून गिरीगव्हारे जवळ केली. आपले आखाडे, मठ, आश्रम स्थापन करून पारमार्थिक जीवनाचा आरंभ केला. यापैकी अनेकांनी पुढे प्रापंचिक जीवनाची अवहेलनाच केली, तिरस्कारही केला. प.पू. दादाजी वैशंयपायन स्वामींच्या प्रेरणेने उभे असलेल्या शेवगांवच्या ''श्री दत्त देवस्थान ट्रस्ट'' च्या वतीने देऊ केलेल्या पुरस्कार प्रदान समारंभात स्वामीजींचा परिचय करून देण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली होती. अगोदर स्वामीजींची काही ग्रंथसंपदा वाचनात आल्याने त्यांच्या ''नांदा सौख्यभरे'' या पुस्तकाच्या संदर्भात बोलताना मी स्वामीजींना सांसारिक सामान्यजनांबद्दल एवढा कळवळा का वाटावा? कुणालाही हा प्रश्न पडावा. सांसारिकाबद्दल तिरस्कार व्यक्त होण्याऐवजी सुखी संसारिक जीवनाची सारी सूत्रेच त्यांनी या पुस्तकरूपाने समोर कशी ठेवली आहेत याचा उलगडा केला.

आधुनिक काळात एकत्र कुटुंब व्यवस्थेचा ऱ्हास होत असल्याच्या असंख्य वेदना स्वामींच्या अंत:करणाला डंख करीत असल्याचे पानापानावर दिसून येते. हे सर्व सावरावे म्हणून व त्यांची वाताहत थांबावी म्हणून कुटूंबातील सर्वच नात्यांना कळकळीने समजावले आहे. सासू-सासरा, सासू-सून, नवरा-बायको हीच नाती सुखी कुटुंबात शत्रुत्वाची बनतात. म्हणून यातील प्रत्येकाला नाती निकोप ठेवण्याचे मर्म स्वामीजींनी ममतेने समजावले आहे. मुलींनी सासरी कसे वागावे याचा चांगला सल्ला त्यांच्या आयाही अलिकडे देत नाहीत, परंतु स्वामीजींनी आदर्श मातेच्या भूमिकेतून मुलींना जसे समजावले तसे लग्नानंतर मुलांनी आपल्या आई-वडिल, सासू-सासरे व पत्नी यांच्याशी कसे वागावे व नाती सांभाळावीत याचे आदर्श मार्गदर्शन या पुस्तकात केले आहे, ते मुळातूनच वाचावे असे आहे.

सांसारिक नसूनही गृहस्थीजीवांप्रती असलेली प्रचंड आस्था, करूणा, प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा ही माऊली संतज्ञानेश्वरांनी दिलेली देणगी आहे. भगवान श्रीकृष्णांनी आदर्श गृहस्थी जीवनाचे सारे आदर्श त्यांच्या जीवनशैलीतून समाजासमोर ठेवले आहेत. सारी नाती कशी नांदवावीत आणि पुढे सांभाळावीत प्रसंगी मोठा त्याग करून ती अधिक घट्ट करण्याचे श्रीकृष्णाने आपल्याला शिकवले आहे. पुढे हिच शिकवण संत ज्ञानदेवांनी, अन्य संतांनी आणि आता स्वामी सवितानंदानी आदर्श समाज धारणेसाठी आपल्यासमोर ठेवली आहे.

आज आपल्या देशातील अध्यात्मीक क्षेत्रात अनेक संन्यासी म्हणून किंवा गृहस्थ म्हणून ''गुरू'' च्या भूमीकेत वावरत आहेत. अनुयायांमध्ये संयम, त्याग, सत्य, अहिंसादी सद्गुणांचा प्रचार-प्रसार ही करीत आहेत. परंतु अनेकांच्या वरवरच्या विरक्तीच्या आड ठासून भरलेली आसक्ती हा खरा चिंतेचा प्रश्न आहे. पौराणिक काळात अशा ''गुरू'' म्हणविणाऱ्यांनी गंडे दोरे, ताईत, तेलं, साबण, अगरबत्ती, धुप, झाडपाल्याचे चूर्ण आदी गोष्टी विकल्याचे उल्लेख नाहीत. अनुयायांना आतून सुंदर बनविण्याऐवजी सौंदर्य प्रसाधने विकून बाह्य

सौंदर्य इच्छिणाऱ्या आजच्या या गुरूजनांचे नेमके ध्येय काय आहे हे सुज्ञांच्या लक्षात आलेच आहे. सारा हिमालय पालथा घालून झाला तरी यांना अजून 'संजीवनी' सापडत नाही तोपर्यंत ते असाच बांधावरचा पालापाचोळा गोळा करून भोळ्या भाबड्या जनतेचे शोषण करून इमले उभे करणार आहेत. समाजाला आतून सुंदर करण्यासारखे यांच्याकडे काहीच नाही म्हणून आजच्या या पार्श्वभूमीवर स्वामींचे कार्य अधिक उठून दिसते. काळ्या दगडावरील पांढऱ्या रेषेसारखी!

स्वामीजींची लहानपणापासूनची निरिक्षणे या ग्रंथ रचनेच्या कामी आली आहेत. पुराच्या पाण्याचा वेग आणि ओढा समजावून घेण्यासाठी नदीच्या पुरातच उतरले पाहिजे असे नाही. काठावर उभे राहूनही त्याची तीव्रता अनुभवता येते. अगदी तसे स्वामीजी संन्याशी असले तरी प्रापंचिकांच्या उंबरठ्याबाहेर उभे राहून घरात काम कसे आणि का चालते आहे याचा अचूक अंदाज बांधीत आहेत.

लग्नासाठी इच्छूक मुला-मुलींना अत्यंत मार्मीक भाषेत त्यांनी उपदेश केला आहे. दोघांनाही त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देतांना त्यांना शाब्दिक टोलेही मारले आहे. आज ''मम्मी, पप्पा, बाल्या, बाली अन् दहा बाय दहाची खोली'' एवढ संकुचित जग केलेल्यांनी आपल्या मात्या-पित्यांची प्रचंड अवहेलना चालविली आहे. सर्व कांही असून ते वृद्धाश्रमात खितपत पडलेले आहेत. हे बंद व्हावे म्हणून घरातील जेष्ठांप्रती आदरभाव वाढवून सुखी होण्याची गुरूकिल्ली तरूणांच्या हाती ठेवली आहे. आज पती-पत्नीचे वितंडवाद वाढत आहेत. कोर्ट-कचेऱ्या चालू आहेत, दोघे कमावते असल्याने एकमेकांवर वर्चस्वासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरू आहेत. त्यातून आज असंख्य संसार मोडून पडले आहेत. एकमेकांचा आदर ही संकल्पनाच मोडीत निघत असल्याने नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत होत ती अखेर तुटून जात आहेत, म्हणून ही सर्व नाती जबाबदारीने कशी सांभाळावीत हे स्वामींनी सोदाहरण समजावले आहे.

स्वामीजींनी या ग्रंथात कुटुंबात स्त्रीचे स्थान आणि भुमिका किती महत्वाची आहे हे जागोजाग विशद केले आहे. सासू, सून, पत्नी या साऱ्या भुमिका संतुलीतपणे पार पाडल्या तर तीच स्त्री कुटुंबात आनंद निर्माण करू शकते. घरात येणारा लाचेचा पैसा घरात पत्नीलाच हवा असतो हे स्वामीजींनी स्पष्टपणे सांगून टाकले आहे, परंतु तोच पैसा मोठा अनर्थही घडवून आणतो याचे भान शिकल्या सवरल्या स्त्रीयांना ही नसते. घरात येऊ घातलेल्या अशा वाईट प्रवृत्तीला ठाम विरोध करून त्याला पायबंद घरातील पत्नीच करू शकते.

अनेकदा शिकवून पुढे त्यांच्या पायावर उभ्या केलेल्या मुलांकडून आई-बापाच्या अनाठायी अपेक्षा असतात. त्या पूर्ण झाल्या नाही तर रक्ताची नाती दुभंगली जातात. मुलांच्या संसारात सारखे डोकावणे, अनाहुत सल्ले देणे, ते पाळण्याचा अट्टाहास करणे यामुळे घरातील अशी जेष्ठ मंडळी मुलगा-सून यांना नकोशी होतात. त्यापेक्षा परिसरातील अनेक चांगल्या ठिकाणांना, संस्थांना जेष्ठांनी जोडून घेऊन सामाजिक कामाला हातभार लावावा ही अपेक्षा ही रास्त आहे.

मी सुरूवातीलाच एका संन्याशाला सांसारिकाबद्दल एवढा कळवळा का? कसला? प्रश्न उपस्थित केला आहे? स्वामींनी या ग्रंथात शेवटी एका वाक्यात त्याचे उत्तर दिले आहे. ''संन्याशी म्हणजे दगड नाही!'' संन्याशाला ही हृदय आहे, संवेदना आहेत, प्रेमभाव आहे. स्वामी सवितानंद अशा सहृदय संन्यासाचे मूर्तीमंत उदाहरण आहे.

प्रा. किसन माने
शेवगांव. जि. अहमदनगर.

९. स्वामीजींचा आत्मसंवाद

– अलका मुतालिक

प. पू. स्वामी श्री.सवितानंद यांचा प्रथम परिचय झाला तो त्यांच्या प्रसाद मासिकातल्या लेखातून होय. त्या लेखांच्या प्रेमात आम्ही उभयतां पडलो. त्यांचा पत्ता फोन नंबर मिळविण्याचा प्रयत्नही केला, पण संपर्क झाला नाही. तीन चार वर्षे अशीच गेली. अचानक प. पू.स्वामीजींचे प्रवचन डोंबिवलीत आयोजित करण्यात आले असल्याचे आयोजकांनी कळविले. 'आंधळा मागतो एक डोळा' अशी स्थिती झाली. श्रीसमर्थ गुरुकृपेने त्यांच्यासह व्यासपीठावर आम्ही एकत्र आलो. दुसरे दिवशी सकाळी ध्यान सत्र होते तेथे ही भेट झाली. तेथे झालल्या परिचयाची परिणती म्हणजे श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली, येथे आयोजित तीन दिवसीय ज्ञानेश्वरीवरील प्रवचनमाला.

याच काळात स्वामीजींची आमच्या घराला चरणधुळी लागली. काही नातीच ईश्वरीय असतात. त्यानुसार स्वामीजींची ग्रंथ संपदा औरंगाबादहून हाती आली. त्यातूनच त्यांचा परिचय अधिक दृढ झाला. प्रामुख्याने लक्षात आले की, ज्ञानेश्वरी हा जणू त्यांचा श्वासआहे. माऊलींच्या ओव्यांना मंत्राचे सामर्थ्य आहे. याची जाणीव ही प्रकर्षाने झाली. यानंतर सप्तशतीचे त्यांचे चिंतन वगैरे वाङ्मय हाती आले. या साऱ्यातून त्यांची स्वतंत्र विचार शक्ती, शब्दाच्या लक्ष्यार्थाची सूक्ष्मता, ते साधकांना मार्गदर्शन करण्याचे शब्दसामर्थ्य हे सारेच विलक्षण आहे. डोंबिवली, मुलुंड येथे त्यांचे दर्शन त्यांच्याच कृपाशिर्वादाने घडत गेले. कृपेचा वर्षाव करणाऱ्या स्वामीजींनी माझ्या धाकट्या लेकीला मार्गदर्शन करुन आजारपणातून अलगद बाहेर काढले. त्यांची ग्रंथ संपदा मजपर्यंत त्यांच्याच कृपाशीर्वादाने पोहचत आहे. हाच त्यांचा कृपाप्रसाद आहे. अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ।। हे त्यांच्याशी जेव्हा जेव्हा संवाद होतो तेव्हा तेव्हा पदोपदी जाणवते. एखाद्याचा सामान्य गुण मोठा करणे हा तर त्यांचा सहज स्वभाव आहे. वाङ्मयाबद्दल त्यांची परखड मते ते सुस्पष्टपणे मांडतात. यात दुखावण्याचा हेतु नसतो. तर कल्याणाचा, हिताचा भाग प्रामुख्याने असतो. वैद्य योगेश जिरांकलगीकर यांचा फोन आला त्यांनी 'श्रीगुरुलीलामृत' आणि याचेच अपत्य असणारे 'येणे वाग्यज्ञे तोषावे' यावर काही लिहावे, अशी विनंती केली. माझ्यासाठी ती स्वामीजींची आज्ञा आणि शब्दफुलांनी त्यांचे पूजन ही संधी होय तरी ही सेवा याचसाठी करण्याचे धाडस करते आहे.

'येणे वाग्यज्ञे तोषावे ' ही छोटी पुस्तिका साधकांसाठी नित्योपासना, ज्याने साधकाचा भावदृढ होऊन अनन्य शरणागती येऊन नाम साधनेचे महत्त्व पटावे यासाठी आहे. स्वामीजींच्या या ओव्या नित्य पठणाने साधकाला मोक्षपदाप्रत नेतीलच. आता मूळ पोथी बाबत काही चिंतन.

स्वामीजींनी त्यांचे श्रीगुरुदेव बाबा यांचा जीवनपट या पोथीत उलगडला आहे. संतांचे चरित्र लिहिण्यासाठी लेखक कवी यांचेपाशी संतत्त्व हवेच. याच संतत्त्वाच्या भूमिकेतून त्यांची अपार श्रद्धा– निष्ठा शब्दांतून प्रगट होत आहे. आदिशक्ति भगवती हे यांचे दैवत पण आपल्या बाबांचे ठायी तेच प्रगटले आहे, ही धारणा महान आहे. संतांच्या चरित्रात चमत्कार हे अध्याहृत असतातच. तसेच यातही ठायी ठायी श्रीगुरुंची महती गाताना स्वामीजींच्या वाणीला बहरच आला आहे. साक्षात सरस्वती जिव्हाग्रे असल्याशिवाय अशी कृती

अशक्यच आहे. संत ग्रंथलेखनाचे कर्तृत्व येऊ नये म्हणून मंगलाचरण करतात. 'मंगल आदिनि मंगल मध्यानि मंगल अन्तानिच'। हे शास्त्र वचन स्वामीजींनी प्रत्येक अध्यायातही तंतोतंत पाळले आहे. याच साहाय्याने ग्रंथाचे कर्तेपण आदिशक्ती जगज्जननीकडे दिले आहे.

हा ग्रंथ गुरु शिष्यांचा संवादरुपी आहे. परमार्थात शंका खऱ्या साधकाला असतातच, त्यामुळे सर्वच पारमार्थिक ग्रंथात संवाद आढळतो, तसा यातही आहे. स्वामीजी आत्मजा संवादी याच चरणाने प्रत्येक अध्यायाची विषयानुरुप मांडणी आहे. आत्मजा हे नावही लक्ष वेधून घेते एकीकडे शिष्या तर लक्ष्यार्थाने आत्मसंवाद असा अर्थ सहज प्रगट होतो. येथे स्वस्वरुप असणारा आत्मा, त्याची शक्ती त्याच्यापासून भिन्न नाही तिच आत्मजा. ईश्वरतत्त्व जे विश्वाचे नियामक आहे त्याच्याशी होणारा संवाद म्हणजे तुकोबांच्या भाषेत आपला संवाद आपल्याशी होय.

यातील प्रथम अध्यायात श्रीगुरुदेवांनी त्यांचेकडून कसे साधन करुन घेतले हे सांगताना नकळत स्वामीजींचे चरीत्रच आले आहे. अज्ञातवासाचीही आज्ञा त्यांनी तंतोतंत पाळली आहे. अज्ञातवास आचरणे सोपे नाही. हे कठीण व्रत गुर्वाज्ञा म्हणून पाळली. या काळातील काही सुखद तर प्रेत योनीतील भ्रमणासारखे दुःखद प्रसंग सुध्दा गुरुकृपेने कसे निरसले हे सहज शब्दात व्यक्त केले आहे. यासाठी श्रीसद्गुरुंचे चरण। हीच एक नौका जगी जाण ।। भवसागर उल्लंघुन । जाण्यासाठी ।। यातूनच ही पोथी (चरीत्र) अहंरहित परतत्त्वाला स्पर्श करुन आलेली ही आहे याचा प्रत्यय भाविक वाचकांना येईल.

दुसऱ्या अध्यायात किरणची कहाणी आहे. यात ही श्रीगुरुंचा महिमा वर्णन करताना शारदामाता जणू थकली असे सांगून महती गायली आहे. निसर्गात जेथे जेथे दृष्टी जाते तेथे त्याचे थिटेपण त्यांना जाणवते. तरी ही याच ठिकाणी तत्त्वदृष्टीही प्रगटते. **गुरुंचे करावे गान। हे या ग्रंथाचे प्रयोजन।** तसेच जीवाच्या त्रिविधतापांची शांती याच मोक्षाला कारणीभूत होते. तर तुमचे-आमचे, प्रपंचाचे, मी-माझेचे भजन बंधनाला कारणीभूत होते. किरणची करुण कथा सांगताना, गुरुदेवांचे पूजन अश्रुंनी करावे यासारखे साधनेचे रहस्य सहज उलगडले आहे.

तिसऱ्या अध्यायात गीतेतील भक्तांचे चार प्रकार सांगून खऱ्या भक्ताने निष्काम उपासनाच केली पाहिजे यासाठी नेमकी मेख (ज्ञानोबांची मेख) सांगताना म्हटले आहे ***तुझे व बाबांचे चिंतन । न रहावे जगाचे भान। व्हावे माझे समर्पण । पदांबुजी ।।*** श्रीगुरुंची सेवा करतांना देहभान विसरुन ते करावे यानेच देहभानातून देवभावात प्रवेश करता येतो. सद्गुरुंना व्यवहारातील कोणतीही उपमा देता येत नाही कारण सारेच नाशीवंत तर श्रीगुरुपद हे अविनाशी आहे. याच अविनाशी श्रीगुरुंनी अविनाशी तत्त्व अंतरी दृढ धरलेले असते, याच जोरावर भक्तांची आपदा निरसून लौकिक सुखासह भक्ती-मुक्ती प्रदान केली आहे.

चौथ्या अध्यायात नाममहती आहे. नामसाधना सर्व संतांनी एकमुखाने गायिली आहे. भक्तासाठी श्रीगुरुंचा मंत्र हाच तारक असतो हे पटवतांना गुरुदेवांनी केलेली अलौकिक लीला अवर्णनीय आहे, तिच शब्दबद्ध केली आहे. देवी भागवतातील वर्णनानूसार बाबा साक्षात देवी स्वरुपात प्रगटले, भ्रमरांस भ्रामरी देवी हे भावपूर्णरित्या मांडले आहे. अर्थात या साऱ्या यौगिक क्रिया श्रीगुरुचरणी आत्मसात करायच्या असतात, यासाठी अनुष्ठानाच्या महतीचे भक्तांना मार्गदर्शन केले आहे.

नंतर ज्ञानियांचा आनंद हा विषय सापेक्ष नसून निरपेक्ष असतो तो नित्य प्राप्त होण्यासाठी आनंदकंद भगवतीची कृपा लागते. तिला तिच्या अनेक नामांनी येथे संबोधले आहे. सामाजिक समतेचा विचार स्पष्ट करुन जात माणसाने (स्वार्थ) निर्माण केली असे परखड मत मांडले आहे. शरीरातील शरीरी हाच जीवात्मा तोच चैतन्यघन आहे. याची अनुभूती संतांना येते. येथेच बाबांचे विलक्षण सामर्थ्य दाखवताना ते भगवतीला आज्ञा करतात की, तू माझ्या भक्ताला दर्शन दे तसे झाले ही आहे. ईश्वराची कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम शक्ती

ज्ञानी संतांच्या ठायी कशी प्रगटत असते हे दाखवले आहे.

मानवी देहालाच पुरुष म्हणतात. कारण पुरी शेति इति पुरुषः। नऊ दरवाज्यात जो झोपता, राहतो तोच पुरुष. याला चारही मुक्तींचा विचार करायचा तर प्रथमतः चार पुरुषार्थ आणि दशम द्वारासाठी श्रीगुरुदेवांचे चरण धरायचे, कारण साधकाला तेथे नेण्याचा साधकाला अधिकार केवळ श्रीगुरुंचाच आहे. श्रीगुरुंच स्मरण, दर्शन, पूजनाने मोक्ष दारी येईल, ही ग्वाही दिली आहे. श्रद्धा, भाव जेथे दृढ असतो तेथे विज्ञान अध्यात्मापुढे झुकते हा सिध्दांतच सांगितला, याठिकाणी मृत्यु ही तुमच्या आमच्या जीवनातील अटळ गोष्ट असून त्याचे प्रकार सांगून जे योगी-ज्ञानी आहे. काळच यांच्या स्वाधीन असतो, हे उपदेशातून सांगितले आहे.

जे आत्म्यामध्ये करिती रमण। ज्यांचे संपले जन्ममरण।। अशी नैष्कर्मसिध्दी ब्रह्मज्ञानी संत प्राप्त करतात, त्यांना जे प्राप्त झाले तेच तुमच्या आमच्या सारख्या सामान्यजनांना प्राप्त व्हावे यासाठी हा बोध आहे. साधकांनी आत्मपरिक्षण करुन ठरवाव, आपण कुठे रत आहोत? नित्य असणारा आत्मा तोच आत्माराम. हीच रमण्याची जागा आहे. येथेच स्थिरावले की देहाचे भान जाऊन विदेहावस्था प्राप्त होते. संतांचे हे निजस्थान आहे. तरीही ते या अवस्थेतून खाली येऊन जन उध्दारासाठी बोध करतात. येथे हा भूल न देता (ॲनेस्थेशिया) ऑपरेशनचा प्रसंग आहे.

पुढे अपमृत्यु टाळण्यासाठी बाबांनी केलेल्या अनेक लीलांचे वर्णन आहे. यातून आपली श्रध्दा बळकट व्हावी, हा एकमेव हेतू आहे. यात अनेक पौराणिक कथांचे दाखले देऊन ईशकृपा, ईशमहती पटवली आहे. गुरुमंत्र रुपी नौकाच तारणारी आहे हे सप्रचित वर्णिले आहे.

यानंतर पांचभौतिक जड प्रकृती तर अष्टधा प्रकृतीची चेतन सृष्टी याचे चिंतन करुन याचे समानाधिकार करुन तत्त्वदर्शन घेता आले पाहिजे. हे सामान्य जीवाचे, सामर्थ्य नव्हे. तेव्हा श्रीगुरुदेव-दर्शन,स्पर्शन, संकल्प, बोध अशा शिष्याधिकारानुसार ज्ञानसंक्रमण-शक्तीसंक्रमण करतात तेव्हा हे तत्वदर्शन करता येते यासाठी शिष्याने निःष्काम उपासनेने त्याचा अधिकार वाढविला पाहिजे. क्वचित एखाद्या सख्यासाठी, वृत्ती पालटवण्यासाठी काही सामर्थ्य संत दाखवतात.

संतांचे बोल रहस्यपूर्ण। सत्याने परिपूर्ण । अर्थ गहन विस्तीर्ण। अनुभवी ।। सारखी ओवी सच्च्या साधकाला मार्गदर्शन करणारी आहे ब्रह्मज्ञानी संत देहातीत-कालातीत असणारे त्यांना लौकिकातील कोणतेच बंधन नसते; त्यामुळे त्यांची वाणी परतत्त्वाला स्पर्श करुन येते. विश्वाच्या अंतर्बाह्य जे तत्त्व भरुन उरले तेच सत्य, जे त्रिकालाबाधित असते **सत्य अनंतं ब्रह्म।** श्रुतिवचन आहे. याचा गहन अर्थ संतच जाणतात. तेच विस्तीर्ण म्हणजे व्यापक तत्त्व आहे याचा बोध, अनुभूती यावी यासाठी श्रीगुरुंच्या चरणी जायचे असते. तेच तत्त्व त्यांच्या अंतरी नित्य असल्याने ते तेजोमय-प्रकाशमय असतात. हे दर्शन स्वामीजी भक्तांना शब्दरुपाने घडवतात.

एखादा सदाचरणी पण तर्कट जीव असेल तर संतांना त्याची दया येते. कारण ते दयाळु असतात. दयाळु म्हणजे परमात्म्याची जी अनुभूती संतांना आली तीच भक्तांना यावी, यासाठी ते विशेष सामर्थ्य वापरुन, त्यांच्या अंतःकरणातील अहंकाराचा लय करुन त्याचे द्रवीभवन करतात. (ललनसिंह). संत्संगातून अंतरंगातील तम अज्ञान जाते, अंतःकरण शुद्धीचा प्रवास सुरु होतो. साधकांसाठी विचार हे फार मोठे साधन आहे. याच विचारांच्या साहाय्याने त्रिगुणांचे कार्य जाणायचे आहे. रज, तम दूर सारायचे, वृत्ती सत्त्वस्थ ठेवायची, पण या तिन्ही बेड्याच आहेत. याचा योग्य तो वापर करुन विचारांनी गुणातीत होणे, याचे सुरेख मार्गदर्शन केले आहे. स्वर्ग-मृत्यु-पाताळ तीन लोक टाळण्यासाठी गुण साधकाच्या-भक्ताच्या ताब्यात हवेत. याच साहाय्याने त्रितापांकडे पाहण्याची सहन करण्याची नवी दृष्टी स्वामीजी देतात. तुर्यावस्था ज्ञानमय असून त्यासाठी मनन,

निदिध्यासन साठी ध्यान साधना अवलंबून साधनारुढ झाले पाहिजे, याच अवस्थेत ही अनुभूती येईल असा निर्वाळा स्वामीजी देतात.

सामान्य जीवाची घसरगुंडी कशी होते? कारण आत्मानंद जो नित्य आहे, तो विसरुन जीव पंचविषयाच्या भोगात रमतो. विषयभोग ईश्वरावरील भाव कमी करतो. परिणामी वासनांचे प्राबल्य वाढून अनेक जन्मांची सोय कर्माने करतो. यासाठी पंचज्ञानेंद्रिये-पंचकर्मेंद्रिये-मन किंवा अंतःकरण या अकरा इंद्रियांना ईश्वरप्रेम किंवा श्रीगुरुचरणांच्या भक्तीत रत ठेवावे. ही साधना, हा भाव ज्याचा त्यानेच जपायचा आहे. जीवाच्या अंतरी अहंकाररुपी दुर्योधन दडलेलाच असतो. हा विद्या-धन-परिस्थिती यौवनाचा अकारण आश्रय घेतो. हे सारे परिवर्तनीय, अशाश्वत आहे. हे संत सद्‌गुरु सातत्याने सांगतात. जग हे सत्य नाही येथे केवळ ब्रह्म सत्ता आहे. ते प्राप्तीसाठी ब्रह्मच सत्-चित्-आनंद-घन आहे. याच्यासाठी ध्यानसाधना-ज्ञानसाधना आहे. साधना ही कृत्रिम असल्याने त्रिपुटीयुक्त आहे. श्रीगुरुंच्या सहवासात सत् चा संग घडतो. निर्गुण ब्रह्म तेच श्रीगुरु रुपाने सगुण साकार आहे. हेच जीवाच्या उध्दारासाठी साकारले असा दृढ भाव धरुन गुरुपूजन, भजन, स्मरण, कीर्तन करावे. याच उपासनेने ब्रह्मभाव, सर्व समभाव भक्ताच्या अंतरी उपजतो. यासाठी पुनश्च एकदा बाबांचे सामर्थ्य वर्णिले आहे.

यानंतर अस्सल उपासना करतांना लक्षात येते की, ईश्वराला आपण काय देऊ शकतो? फुलं, तांदुळ, भाज्या, सर्व पशू, धान्य कशाचीही निर्मिती आपण केलेली नाही ***कासयाने पूजा करु केशीराजा।*** हा भाव स्वामीजींनी अनेक उदाहरणांनी स्पष्ट केला आहे. यातील मागणे अतिशय गोड आहे. ***जय गुरुदेवा । माझ्या हृदयीचा ठेवा । हनुमान हृदयी रामसीता । तैशापरी।।*** श्रीगुरुसेवा कशी करावी, याचे परिपूर्ण मार्गदर्शन येथे केले आहे. भक्तांनी ते मूळातूनच वाचावे. गुरुनिंदा, गुरुद्रोह यासारखे प्रमाद कधीही करु नयेत.

पुढे आपल्या ऋषीमुनींनी जो ज्ञानभंडार ठेवा दिला, त्याचे यथार्थ वर्णन आहे पिण्डी ते ब्रह्मांडी हा धागा पक्का आहे. सगुण साकार मूर्तीपूजेतून निर्गुणाप्रत जाता येते. मूर्तीपूजा हा सेतू आहे. सगुणातून निर्गुणात, गौणी भक्तीतून परा भक्तीत, सकामतेतून निष्कामतेत नेणारा हा सेतू साधक-भक्तांनी कसा बांधावा यासाठी मातेप्रमाणे बोध केला आहे. भक्तांच्या जीवनात काही संकटे येणारच असतात तेव्हा त्याही प्रसंगी शांत राहून श्रध्दा बळकट ठेवली तर संकटातले संकटत्व (विघ्नत्व) नाहीसे होते असा बोध करतांना बाबांच्या अनेक लीला वर्णिल्या आहेत.

माता जेथ तेजरुपी । तेजाने तेजाची आरती।। येथे भगवती मातेचे वैभव सांगून तिची उपासना कशी करता येते, याचे रहस्य उलगडले आहे. मातेस पंख्याने वारा घालताना चित्तातील धूळ उडते यातून मरुत् म्हणजे वायुतत्त्वाचे महत्त्व ब्रह्मांडात पिंडात कसे आहे, हा विचार आहे. जीवाचे ठिकाणी तो श्वासरुपाने आहे. गुरुदेव शक्तिबालक शरणागताला समाधीसाठी कसे साधन करुन घेतात याचा दाखला आहे. पातंजल योगसूत्रात पारंगत असणाऱ्या त्यांनी फोटोतून स्व अस्तित्वच काढून घेऊन चकित केले. हे सांगताना म्हणतात ***परी सद्‌गुरुंचे दर्शन। तोचि खरा जन्मदिन। ज्यात मृत्यु विधान। नसे कधी।।*** त्यांच्याच कृपेने ज्ञानामृताची वृष्टी होऊन अमरत्वाची पुष्टी होते साधक मोक्षमुखी होतो.

गिरीजा या साधिकेच्या उदाहरणाने ***जीवाने शुभाशुभ कर्मे सारी। फलासह चरणी अर्पावी। अंकुरहीन तेणे होती। कर्मे सारी।।*** जीवाला कर्माच्या सुखदुःखरुपी तडाख्यातून सुटण्यासाठी कर्मे निर्लेप हवीत हे प्रतिपादीले आहे. त्याचा सुलभ मार्ग ती कर्म गुरुस्मरणात करावीत. त्यानांच समर्पित करावीत. याने अहंता ममता दूर रहाते याने श्रीगुरुकृपा निरंतर बरसते.

सांख्य तत्त्वज्ञानाचा सविस्तर ऊहापोह केला आहे. पुरुष केवळ सहकारी होतो तर प्रकृतीच कार्य करते.

शक्तीस्वरुप ती देव-देवतांकडून सुद्धा कशी दिव्य कार्ये करवुन घेते, याचे दाखले दिले आहेत. गुरुनामाचे कीर्तन करा। अशी आज्ञा देऊन त्याची महती पटवली आहे. बाबांचे ठायीचे सामर्थ्य वर्णन करतांना भूतपिशाच्च ही संतांच्या समोर सामर्थ्यहीन होतात, हे स्वानुभवाने कथिले आहे. शक्तिपात दीक्षा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. अनेकांना त्यांनी भगवतीच्या विविध रुपांत दर्शन देऊन संकटमुक्त केले. येथेच स्मृती, मेघा, प्रज्ञा हे बुध्दीचे सूक्ष्म पदर ही उलगडून दाखवले आहेत.

गुरुकृपेचा खरा लाभ संसार भोग नसून ईश्वर योग आहे, हे स्पष्टपणे बजावले आहे त्यांचे ठायी भेददृष्टीच नाही. विश्वरुपात एकच तत्त्व कसे आहे यासाठी अनेक उदाहरणे दिली आहेत. ज्यांनी ती दृष्टी दिली, दान दिले त्यांचे शिवरुपातील वर्णन मनाला मोहिनी घालणारे आहे. जड चेतन सारीच सृष्टी संतांच्या स्वाधीन असते. ईशतत्त्व ज्यांनी अंतरी दृढ धरले, त्यांचे कडे ईशतत्व सहजच येते. याच्या स्तव या लीला आनंददायी आहेत. बाबा भक्तांचा शुद्ध भाव पाहून वस्त्रे ग्रहण केली तर कधी शत्रुवर सुध्दा कृपाच केली. या साऱ्यातून आपला भाव किती शुद्ध निष्काम ठेवावा हेच सुचविले आहे.

स्वामीजींची ***आत्मदृष्ट्या एकरुप । जीवदृष्ट्या तुझे रुप । देहदृष्ट्या मी सेवक । जगन्माते।।*** ही ओवी वाचताना रामायणातील हनुमंताच्या देहबुध्द्या तव दास्योऽहं। जीवबुध्द्या त्वदंशः। तत्त्वबुध्दत्मात्वमेवअहं। इति मे निश्चिता मतिः।। याचे स्मरण झाले यावरुनच साधु दिसती वेगळे तरी स्वरुपाने एकच हेच इथे स्पष्ट समजते. या भूमीकेवर कर्मरुपी पूजा ईश्वराला समर्पित करायची हे समजावले आहे. साधकाला येणारी निराशा म्हणजे पठारावस्था (शास्त्रनुसार) येथे श्रीगुरुदेवांच्या कृपेची साथ कृपा कशी मिळाली हे सप्रचीत दर्शवले आहे.

जर साधक-भक्तांना जीवनात शांती-समाधान-सुख-आनंद, तृप्ती हवी तर, ते गुरुकृपेविण अशक्य आहे. ***सवितानंदांची विनंती । या सुखाची करा प्राप्ती । तेणे लाभो अपूर्व शांती । तुम्हां सर्वां ।।*** येथे त्यांना वाटणारी तळमळ, त्यातून केलेली विनंती ही अत्यंत कृतार्थतेसाठी आहे. श्रीगुरुंची सेवा याचे पूर्णतः मार्गदर्शन करुन या ग्रंथाचा कळसाध्याय साधला आहे. यात श्रीगुरुभक्तीरुपी सरोवरात मुक्तपणे डुंबावे, विचारांचे तुषार घेऊन निरपेक्ष आनंदाने कृतार्थ व्हावे. असे कृतार्थ झालेले स्वामीजी ही सेवा श्रीगुरुचरणी भगवती चरणी समर्पीत करतात. निर्लेप कर्तृत्वरहित अहंरहित त्यांचा बोध सर्वांनाच निर्विषानंदाची प्राप्ती करुन देईल यात शंका नाही. स्वामीजींच्या वचनांची त्यांच्याच शब्दात केलेली ही शब्दपूजा त्यांनी स्वीकारावी. ही नम्र प्रार्थना करुन विराम पावते.

अलका मुतालिक
डोंबिवली